# मराठी ख्रिस्ती नियतकालिके

## १८०० ते १९५०

ज्ञानोदय
उदयप्रभा
पहारेकरी
ऐक्यप्रदर्शकपत्र
शुभवर्तमानदर्शक
आणि चर्चसंबधी
नानाविध संग्रह
बालबोधमेवा
मन्ना
सत्यवादी
मुक्तिसमाचार
राजमार्ग
सिंहनाद
जागल्या
धांजेरा
दिव्यप्रकाश
मबास्सेर
ख्रिस्ती लोकांचा कैवारी
विवेचक
निरोप्या
ख्रिस्ताश्रम
धमाशी
पवित्रनाम
सच्छास्त्रप्रदीपक
धर्मदीपिका

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८८३

REFBK-0023281

भास्कर जाधव

निबंध

# मराठी ख्रिस्ती नियतकालिके

REFBK-0023281

भास्कर जाधव

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

हाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य परिषद प्रकाशन
पुणे

प्रकाशन क्रमांक : ४

*

किंमत रु. ३·००

*

२३ मे १९८१

*

©महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य परिषद

*

प्रकाशिका :
श्रीमती विजया पुणेकर
सरचिटणीस
महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य परिषद
४२४ रास्ता पेठ,
पुणे ४११ ०११

*

मुद्रक :
अ. चिं. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनिवार पेठ, पुणे
पुणे ४११ ०३०

संदर्भ
निबंध
२००३
2320
घ४०

# प्रभोदय.

## THE PRABHODAYA, OR RISING OF LIGHT.

पुस्तक ४. मुंबई; मार्च, सन १८६९. अंक १.

बरें करितांना थकूं नये, कारण कीं, आपण न थकलों तर यथाकाळीं पीक पावूं.

अनुक्रमणिका.

१ आमच्या वाचणारांस सूचना . . . ४
२ मनुष्य विचारवान् ह्मणजे विचारविशिष्ट आहे . . . ६
३ मेहेनतीची फळश्रुति वाढविणारीं कारणें . . . ८
४ ईश्वरोक्तशास्त्र सृष्टीच्या रचनेशीं व क्रमाशीं अनुसरून आहे याविषयीं उपमान प्रमाण . . . १२
५ जीवमात्र विद्या . . . १५
६ ईश्वरानें मनुष्यास कोणत्या हेतुस्तव उत्पन्न केलें . . . १८
७ फुटकळ विषय . . . २०
  १ टपालाचा वसूल . . . २०
  २ भाषांची संख्या . . . २०



मुंबईमध्यें टामस ग्रेहेम यांणीं छापलें—सन १८६९.

BOMBAY:—PRINTED BY T. GRAHAM.

REGISTERED No. 18—1872.

# सत्यदीपिका.

## THE LAMP OF TRUTH.

पु. १२. मुं. दिसेंबर, १८७२. अं. १२.

### अनुक्रमणिका.


१—अरण्याची माता ............ १७७

२—चंद्रवर्णन ............... १८२

३—नवीं पुस्तकें ........... १८५

४—पुण्यांतील यजुर्वेदाची शाळा... १८७

५—मुलांचें जुगदान ............ १९१



BOMBAY:

PRINTED FOR THE

Christian Vernacular Education Society

Under the direction of the

BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY,

AT THE "ORIENTAL PRESS."

1872.


पहिले ख्रिस्ती बालमासिक

सत्यदीपिका (धाकटी)

Registered No. 76 of 1875.

# सत्यदीपिका.

## (THE LAMP OF TRUTH.)

पुस्तक २. ड्यानुआरी, सन १८७५. अंक ११.

अनुक्रमणिका. पृष्ठ.


१ The Character of a Christian ............... १६०
२ Correspondence. ............................ १६१
३ रा० रा० पद्मनजी माणिकजी..................... १६४
४ निबंधमाला.................................. १६७
५ ब्राह्मणांचें ईश्वरी ज्ञान........................ १७०
६ नवीं पुस्तकें ................................ १७२
७ कासपर हावसर .............................. १७३
८ प्रस्तुतवृत्त व अभिप्राय.......................... १७४


PRINTED FOR THE PROPRIETOR

AT THE

ASIATIC PRINTING PRESS, BOMBAY

AND

PUBLISHED AT THE

SATYA DIPICA OFFICE, BOMBAY & POONA.

# ज्ञानोदय

## बालबोध मेवा

पुस्तक ४. तारीख ६ वी जानुएरी, १८७६. अंक १.


“तुम्ही परमेश्वराला स्तवा,



परमेश्वराचे उपकार माना.”

### नव्या वर्षासाठीं गीत.

भुजंगप्रयात.

१ अभारी मनानें प्रभूलाच वंदा,
तुम्हा हीहि आशा किती गोड यंदा;
नव वर्ष हें सर्व जावो सुखाचें
तुम्हा सौख्य लाभो प्रभूच्या मुखाचें.
२ असें दाविदें वंदिलें ईश्वरासी,
तसें नित्य गावें तुम्ही तारकासी;
करावेंच हें योग्य आहे तुम्हाला,
असा मान शोभे प्रभु ख्रीस्त याला.

भा० सा०

### ईश्वर पालक.—(कवाल)

धु० ईश्वर पालक माझा
कांहिं उणें मला नच होई.
१ हिरव्या कुरणीं मज बसुं देतो.
स्वच्छ जलावर नेतो. धु०
२ मम जीवहि तो सावध करितो
न्यायपथीं चालवितो. धु०
३ मृत्युदरीं मी न भिईं विघ्ना
मजसंगति तूं राणा. धु०
४ तव अंकुडी तव काठी मातें
देति समाधानातें. धु०

कृ० रा० सा०

# कुटुंबमित्र.

# KUTUMBMITRA.

पुस्तक १. जानेवारी १८८४. अंक १.

अनुक्रमणिका.


| | | | |
|---|---|---|---|
| प्रस्तावना... ... ... ... | १ | पवित्रशास्त्राचा इतिहास. | १५ |
| गारफील्डाचें चरित्र. ... | ३ | इंग्लंडाची स्थिति (२५००). | १८ |
| हागार व इश्माएल... ... | ८ | जनावरांविषयीं... ... ... | २१ |
| नाताळ... ... ... ... | १३ | शाब्बाथ शाळा...... ... | २३ |


किंमत

दरसाल. ...... रु० १½.

दर प्रतीस...... आणे २.

BOMBAY.

TRACT AND BOOK SOCIETY.

निर्णयसागर छापखान्यांत छापिला.

# स्त्रियांची मैत्रीण

THE WOMAN'S FRIEND.

January 1921.


## रोजचा निरोप.

मग दूत त्यास ह्मणाला, "भिऊं नका, कारण कीं, पहा जो मोठा आनंद सर्व लोकांस होईल त्याचें शुभवर्तमान मी तुह्मांस सांगतों, कीं दावीदाच्या नगरांत तुह्मासाठीं आज तारणारा जन्मला आहे, तो ख्रिस्त प्रभु आहे."

TABLE OF CONTENTS.


Children's Page.
How Tod was made Captive
Heels and Toes.
Death to the True Christian
The story of s[illegible] e poor Village Christians.
A Riches of a Nation
My Childhood.
7. To keep one's Direction without a Compass.
8. Changing the shade of Flowers.
9. Ten things every parent should know about Tobacco.
10 For a small Garden.


देवानें जगावर एवढी प्रीति केली कीं, त्यानें आपला एकुलता पुत्र दिला. यासाठीं कीं जो कोणी त्यावर विश्वास ठेवितो त्याचा नाश होऊं नये, तर त्याला सर्वकालचें जीवन प्राप्त व्हावें.

योहान ३०:१६.

देव प्रीति आहे.

१ योहान. ४:८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८८३
२३२८९
निबंध
१५५९
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# प्रकाशकांचे मनोगत

—•—

श्री. भास्करराव जाधव यांनी, १९७२ साली, पुण्यात पार पडलेल्या मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनात 'मराठी ख्रिस्ती नियतकालिके – १८४२ ते १९००' हा शोधनिबंध सादर केला. त्यानंतर १९७३ साली गोरेगाव, मुंबई, या ठिकाणी पार पडलेल्या संमेलनासाठी नियतकालिकांचा १९०१ ते १९५० या कालावधीतील इतिहास लिहून त्याचे त्यांनी वाचन केले.

महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य परिषदेने डिसेंबर १९७३ आणि आक्टोबर १९७५ या साली प्रसिद्ध केलेल्या वरील दोन संमेलनांतील शोधनिबंध संग्रहात "मराठी ख्रिस्ती नियतकालिके" या शोधनिबंधाचा समावेश होऊ शकला नाही. श्री. जाधव यांनी हा इतिहास अद्ययावत तयार करावा आणि मग त्याचे स्वतंत्र ग्रंथरूपात प्रकाशन करावे असे परिषदेने ठरविले होते.

१९७५ साली बारामती या ठिकाणी भरलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी श्री. भास्करराव जाधव यांची निवड झाली होती. त्यानंतरच्या कालावधीत परिषदेला काही संस्थांकडून (ख्रिस्ती साहित्य प्रसारक, वर्ल्ड व्हिजन) प्रकाशनासाठी देणग्या मिळाल्या. तसेच संमेलन खर्चातून काही शिल्लक हाताशी आली. तेव्हा हा ग्रंथ छापण्याचे काम हाती घेण्याचे ठरले.

श्री. जाधव यांनी १९८० पर्यंतचा इतिहास पूर्ण करावा अशी एक सूचना करण्यात आली आहे. तूर्त आठ वर्षांपूर्वी सादर केलेल्या शोधनिबंधांचे प्रकाशन मे १९८१ मध्ये अहमदनगर येथे भरविण्यात येणाऱ्या ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या वेळी पार पडणे औचित्यपूर्ण ठरेल.

श्री. जाधव यांना जुने ग्रंथ आणि जुने साहित्य जमविण्याचा, त्यांचा अभ्यास करण्याचा छंदच आहे. त्यांत ते अतिशय रस घेतात. त्यांच्या या छंदाचा लाभ मराठी खिस्ती साहित्याच्या इतिहासाला होतो आहे याचे परिषदेला समाधान वाटते. एक ऐतिहासिक संशोधन म्हणून हा ग्रंथ निश्चितच उपयुक्त आणि संग्राह्य ठरणार आहे यात शंका नाही.

विलंबाने का होईना महाराष्ट्र खिस्ती साहित्य परिषदेचे हे चौथ प्रकाशन पार पडत आहे याविषयी कृतज्ञता वाटते.

एथेल गॉर्डन अध्यापिका विद्यालय,
४२४ रास्ता पेठ,
पुणे ११.

विजया पुणेकर
सरचिटणीस,
महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य परिषद

एप्रिल १९८१

# प्रास्ताविक

---

पहिले मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन १८ एप्रिल १९२७ रोजी नासिक येथे भरविण्यात आले होते. त्याप्रसंगी सुप्रसिद्ध ख्रिस्ती साहित्यिक रेव्ह भास्करराव उजगरे यांनी वाचलेल्या निबंधात महाराष्ट्रीय ख्रिस्ती साहित्याचे समालोचन केले होते. याच निबंधात त्यांनी १९२७ पर्यंत प्रसिद्ध झालेल्या २० / २१ मराठी ख्रिस्ती नियतकालिकांची त्रोटक माहिती दिली आहे. या विषयावरची माहिती संग्रहित करण्याचा हा बहुधा पहिलाच प्रयत्न असावा.

सूचिकार शंकर गणेश दाते यांनी मराठी नियतकालिकांचा सूचिग्रंथ संपादून मराठी वाचकांपुढे मांडण्याचा संकल्प डिसेंबर १९६५ त सोडला होता. त्याप्रमाणे दाते सूचिमंडळाने ते कार्य पुरे केले व मराठी नियतकालिकांची सूची ( १८००–१९५० ) प्रथम खंड, कालिक–वर्णन–कोश १९६९ त प्रसिद्ध झाला. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ पुरस्कृत अशा या सूचीत ५० / ६० मराठी ख्रिस्ती नियतकालिकांची माहिती आली आहे.

या सूचीचे काम चालू असतानाच माझे लक्ष या विषयाकडे अधिक ओढले गेले. मराठी ख्रिस्ती नियतकालिकांची माहिती व त्यांचे अंक मिळविण्याच्या खटपटीस मी लागलो. २५ / ३० नियतकालिकांचे काही किरकोळ अंक आणि काही वर्षांचे बांधलेले अंक माझ्या संग्रही होतेच. मित्रांनीही काही अंक मिळवून दिले. याशिवाय 'ज्ञानोदया'चे दप्तर, मिशनांचे वार्षिक अहवाल, इतिहासविषयक ग्रंथ वगैरेंतून त्रोटक माहिती मी जमविली.

याप्रमाणे माहिती जमविताना पदोपदी निराशेचे प्रसंग आले. एक 'ज्ञानोदय' वगळता, या दीडशे वर्षांच्या काळात कोणत्याही नियतकालिकाचे दप्तर ठेवण्याचा, कोणा संपादकाने, प्रकाशकाने अगर इतर संबंधित व्यक्तीने प्रयत्न केल्याचे आढळत नाही. कधीतरी कुणी असा प्रयत्न केलेला असला तरी त्या नियतकालिकांचा एखादा अंकदेखील पाहायला मिळायची मारामार! आणि त्यांची इतर कसलीही माहिती मिळणे तर दुरापास्तच! क्वचित प्रसंगी खासगी संग्रहात जतन केलेल्या नियतकालिकापर्यंत हात पोचणेदेखील अशक्य झाले. अशा परिस्थितीत कित्येक नियतकालिकांचा तपशील देणे अशक्यप्राय होऊन बसले. काही नियतकालिकांची नावापलीकडे अधिक माहिती मिळत नाही. तरी या विषयावर अधिक अभ्यासपूर्ण संशोधन होणे अगत्याचे आहे. तूर्त गेल्या दीडशे वर्षांत निघालेल्या मराठी ख्रिस्ती नियतकालिकांचा हा धावता आढावा सादर करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

१/३ वासवानी कुंज,
साधू वासवानी रोड,
पुणे ४११ ००१.

भास्कर सदानंद जाधव

महाराष्ट्र दिन १९८१

ऋणनिर्देश :

या निबंधासाठी अनेक मित्रांनी माहिती पुरवून, अंक देऊन वा दाखवून मला उपकृत केले आहे. तसेच, थिऑलॉजिकल सेमिनरी ऑफ महाराष्ट्र या संस्थेत असलेले ज्ञानोदयाचे दप्तर चाळण्याचीही संधी मला मिळाली. शिवाय शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे येथेही काही नियतकालिके उपलब्ध झाली. या दोन्ही संस्थांच्या चालकांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

भा. स. जाधव

# मराठी ख्रिस्ती नियतकालिके

## अनुक्रमणिका

खंड १ ला : १८००–१९००


| | नाव | आरंभ | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | ज्ञानोदय | १८४२ | १ |
| २ | तारप्रसारक | १८५० | २ |
| ३ | उदयप्रभा | १८५६ | २ |
| ४ | प्रभोदय | १८५९ | २ |
| ५ | सत्यदीपिका ( धाकटी ) | १८६१ | ३ |
| ६ | सायंदीपिका | १८६१ | ४ |
| ७ | पहारेकरी | १८७० | ४ |
| ८ | ऐक्य प्रदर्शक पत्र | १८७१ | ४ |
| ९ | शुभवर्तमानदर्शक व चर्चसंबंधी नानाविध संग्रह | १८७२ | ५ |
| १० | बालबोध मेवा ( मुलांचा भाग ) | १८७३ | ५–६, ३० |
| ११ | सत्यदीपिका ( थोरली ) | १८७३ | ६ |
| १२ | मान्ना | १८७७ | ८ |
| १३ | प्रकाशता ( प्रकाष्ठा–प्रकाशक ) | १८७९ | ९ |
| १४ | शब्बाथशाळेच्या धड्यावर टीका | १८८० | ९ |
| १५ | सत्यवादी | १८८२ | १० |
| १६ | मुक्तिसमाचार | १८८२ | १० |
| १७ | कुटुंबमित्र | १८८४ | १० |
| १८ | राजमार्ग | १८८५ | ११ |

| | नाव | आरंभ | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १९ | सुमंत | १८८८ | १२ |
| २० | सिंहनाद | १८८९ | १२ |
| २१ | जागल्या | -- | १३ |
| २२ | धांडोरा | — | १३ |
| २३ | दिव्यप्रकाश | १८९० | १३ |
| २४ | सूर्यप्रकाशक | -- | १३ |
| २५ | मब्बासेर | १८९२ | १४ |
| २६ | स्त्रियांची मैत्रीण | १८९३ | १४ |
| २७ | बाळशिक्षक | १८९३ | १५ |
| २८ | सन्मित्र | १८९४ | १५ |
| २९ | सुवार्तिक | १८९८ | १६ |
| ३० | एतद्देशीय ख्रिस्ती लोकांचा कैवारी | १८९९ | १६ |
| ३१ | ख्रिस्ती | १९०० | १६ |

खंड २ रा : १९००–१९५०

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | विवेचक | १९०१ | १८ |
| ३३ | निरोप्या | १९०३ | १८ |
| ३४ | ख्रिस्ताश्रम | १९०४ | १९ |
| ३५ | मधमाशी | १९०४ | १९ |
| ३६ | ख्रिस्ती नागरिक | १९०४ | २० |
| ३७ | पवित्र नाम | १९०६ | २१ |
| ३८ | बंधुप्रीति | — | २२ |
| ३९ | सच्छास्त्रप्रदीपक | १९०८ | २२ |
| ४० | धर्मदीपिका | १९१० | २४ |
| ४१ | शब्बाथशाळापत्रिका | १९१२ | २५ |
| ४२ | प्रेमदर्शिका | १९१२ | २५ |

| | नाव | आरंभ | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ४३ | समाजादर्श | १९१३ | २६ |
| ४४ | धर्मप्रचारक | १९१३ | २६ |
| ४५ | सुवृत्तप्रसार | १९१६ | २६ |
| ४६ | तरुण शिपाई | १९१९ | २७ |
| ४७ | मेथॉडिस्ट संदेश | १९२१ | २७ |
| ४८ | मातृसंघ | १९२२ | २७ |
| ४९ | भारत ख्रिस्ती सेवक | १९२३ | २८ |
| ५० | ख्रिस्ती | १९२३ | २८ |
| ५१ | नवा शिक्षक | १९२४ | २९ |
| ५२ | मेसेज | १९२५ | २९ |
| ५३ | अंमलदार | १९२५ | ३० |
| ५४ | प्राग्ज्योति | १९२५ | ३१ |
| ५५ | हिंदी ख्रिस्ती पंचांग | १९२६ | ३१ |
| ५६ | सुवृत्तप्रसार | १९२९ | ३१ |
| ५७ | नाशिक धर्मप्रांत | १९३० | ३२ |
| ५८ | ख्रिस्ती लोकशिक्षण माला | १९३२ | ३२ |
| ५९ | शोध आणि बोध | १९३५ | ३३ |
| ६० | ख्रिस्ती नागरिक | १९३७ | ३३ |
| ६१ | ख्रिस्ती निरीक्षक | १९३८ | ३३ |
| ६२ | आमचे पत्र | १९३८ | ३४ |
| ६३ | समाज-सेवक | १९३८ | ३४ |
| ६४ | सुवार्ता | १९३९ | ३५ |
| ६५ | दलित दीपक | १९३९ | ३५ |
| ६६ | आवेश | १९४१ | ३६ |
| ६७ | अंकुश | १९४२ | ३७ |

| | नाव | आरंभ | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ६८ | रणशिंग | १९४४ | ३८ |
| ६९ | दीपक | १९४७ | ३८ |
| ७० | आमचा बालमित्र | १९४७ | ३९ |
| ७१ | ख्रिस्ती हितचिंतक | १९४७ | ४० |
| ७२ | प्रगति | १९४८ | ४० |
| ७३ | ख्रिस्ती जीवनप्रकाश | १९४८ | ४१ |
| ७४ | शांतिदूत | १९४८ | ४२ |
| ७५ | सत्यवाणी | १९४९ | ४३ |
| ७६ | सूर्यकिरण | १९४९ | ४४ |
| ७७ | विक्रम | १९४९ | ४४ |


—०—

# मराठी ख्रिस्ती नियतकालिके

## खंड १ ला : १८००–१९००

मराठी ख्रिस्ती नियतकालिकांचा इतिहास लिहिताना मराठी भाषेतले सर्वांत जुने, सव्वा शतकाहून अधिक वर्षे सतत चालू राहण्याचे भाग्य लाभलेले, मराठी ख्रिस्ती समाजाचे आद्य नियतकालिक म्हणून **ज्ञानोदय** या मासिकाचा मोठ्या अभिमानाने उल्लेख करायला हवा. सन १८४२ च्या सुरवातीला ज्ञानोदयाची कल्पना प्रथम अहमदनगरच्या अमेरिकन मराठी मिशनच्या मिशनरींना सुचली. १८१३ साली जेव्हा हे मिशन मुंबईत स्थापन झाले व तेथे छापखाना घालून ख्रिस्ती वाङमयाची निर्मिती करू लागले तेव्हाच त्यांनी एक नियतकालिक काढले होते असे म्हणतात; पण त्याविषयी निश्चित माहिती उपलब्ध झालेली नाही. ज्ञानोदय निघाला तेव्हा आठदहा नियतकालिके प्रसिद्ध होत असत. त्यांतून धर्मासंबंधी वादविवाद आणि ख्रिस्ती धर्मावर कडाक्याची टीका सर्रास येत असे. त्यांना तोंड देण्यासाठी एक प्रभावी शस्त्र म्हणून ज्ञानोदयाचा जन्म झाला.

ज्ञानोदयाचा पहिला अंक जून १८४२ त अहमदनगर येथे प्रसिद्ध झाला. तो फुलस्केप चतुष्पत्री आकाराचा आणि वीस पृष्ठांचा होता. रेव्ह. ए. ॲबट यांच्या देखरेखीखाली शिळा छापात तो छापला होता. "अमेरिकान मीशन शीळा छाप अहमदनगर १८४२ रामा गुजराथी छापणारा" असे त्यावर लिहिले आहे. रेव्ह. हेनरी बॅलंटाईन हे ज्ञानोदयाचे पहिले संपादक. पहिल्या अंकाच्या पहिल्या पृष्ठावर ते म्हणतात, 'हें पत्र दर महिन्यांत एकवार छापलें जाईल. एकेक पत्राला दोन आणे किमत पडेल.' ज्ञानोदयाची वार्षिक वर्गणी दीड रुपया असे. 'साहेब लोकांस' मात्र तीन रुपये पडत. ज्ञानोदयाच्या वर्गणीदारांत बरेचसे ख्रिस्तीतर वर्गणीदार असत. त्यांत डॉ. भाऊ दाजी, महर्षी दादाभाई नौरोजी यांच्या बरोबरच भुसावळचे ॲक्टिंग पोलीस इन्स्पेक्टर मि. नूरखान, मुनशी वजीर अल्ली, सुभेदार सालोमन इस्राएल, तसेच कर्सेटजी

आणि कंपनी, रा. ब. दादोबा पांडुरंग, चीफ ऑफ औंध अशी विविध नावे आढळून येतात. ख्रिस्ती वाचकांत बाबा पदमनजी, नारायणराव शेषाद्री, गणपतराव नवलकर, कृष्णराव सांगळे, मेजर कँडी वगैरे नावे आहेत.

नामांकित ख्रिस्ती साहित्यिकांनी ज्ञानोदयाचे संपादकपद भूषविले आहे. तो आतापर्यंत पाक्षिक, साप्ताहिक स्वरूपात इंग्रजी, मराठी असा प्रसिद्ध झाला आहे. सध्या तो संपूर्णतया मराठीत मासिक म्हणून प्रसिद्ध होत आहे.

यानंतर १८५० त हरी केशवजी यांच्या संपादकत्वाखाली **तारप्रसारक** या नावाचे एक नियतकालिक निघाले होते. या हरी केशवजींचे शिक्षण रॉबर्ट मनी स्कूल, मुंबई येथे झाले होते व रेव्ह केनी यांनी त्यांना इंग्रजीचे शिक्षण दिले होते. "यात्रिकक्रमण" हा भाषांतरित ग्रंथ यांच्याच हातचा. पण तारप्रसारक या हरी केशवजींनी काढलेल्या मासिकाची नावापलीकडे अधिक माहिती मला मिळू शकली नाही. रा. गो. कानडे यांच्या 'मराठी नियतकालिकांचा इतिहास' यात याचा उल्लेख आहे.

जानेवारी १८५६ मध्ये बाबा पदमनजी यांनी **उदयप्रभा** या नावाचे मासिक काढले. स्वतंत्र मासिक काढण्याचा हा बाबांचा प्रथम प्रयत्न. काही मित्रांच्या मदतीने त्यांनी हे देशी ख्रिस्ती व मुमुक्षू यांच्याकरिता काढले होते. याची वार्षिक वर्गणी 'नेटिव्हास' बारा आणे व युरोपियनांस दीड रुपया असे.

"देशी ख्रिस्ती मंडळींनीं देशी ख्रिस्ती मंडळींना मार्गदर्शन करावयासाठी चालविलेलें मासिक" असे याविषयी म्हटले आहे. या मासिकाबद्दल लिहिताना ज्ञानोदयकार म्हणतात, "या मासिकातील लेखकांची भाषा शैलीदार आहे. देशी ख्रिस्ती लोक 'मिशनरी मराठी' लिहितात अशी अनेक वेळा तक्रार केली जाते. पण आमची अशी आशा आहे कीं, या मासिकांत शुद्ध मराठी वळणाची शैली असेल. ती परकीय मिशनऱ्यांना मार्गदर्शक ठरेल. मराठी बोली भाषेंत फार कमी पुस्तकें आहेत, अशी तक्रार मराठी भाषा शिकू इच्छिणारे परकीय करीत असतात. त्यांची गरज या ख्रिस्ती मासिकानें भागू शकेल." ( ज्ञानोदय १-२-१८५६ ).

सुरवातीला हे छापायला कुणी तयार होईना. शेवटी एका मित्राच्या मध्यस्थीने बापू हरशेट यांनी ते शिळा छापात छापायचे कबूल केले. याच्या

२५० प्रती काढीत. अनेक ख्रिस्तीतर वर्गणीदार मिळाल्यामुळ बाबांनी यात विविध लेख देण्यास सुरवात केली. पहिली दोन वर्षे हे ठीक चालले होते पण १८५८ च्या शेषटी त्याला उतरती कळा लागली. बापू हरशेटना लोकांनी भंडावून सोडले. "एकतर त्याचा शिळाछाप बरोबर नव्हता व दुसऱ्या कांहीं कारणांवरून वाचकांस त्याचा कंटाळा येऊ लागला होता, आणि छापणारा हिंदू होता. त्यानेंहि हे ख्रिस्ती पत्र छापण्याचें सोडून दिलें," असे एका ठिकाणी लिहिले आहे. त्यामुळे डिसेंबर १८५८ त शेवटचा अंक निघून ते बंद पडले.

पुढे १ एप्रिल १८५९ च्या ज्ञानोदयात लिहिल्याप्रमाणे 'मुंबई इलाख्यांतील उदार ख्रिस्ती गृहस्थांनीं सुसमयीं द्रव्याश्रय दिल्हा. तेणेंकडून तें तीन मास निद्रा घेऊन आता रूपांतर व नामांतर पावून जागृत झालें व मार्च महिन्यापासून पुन्हा मार्गक्रमण करूं लागले आहे ... तें सुंदर कागदावर सुंदर ठशांनी छापतें व त्यावर रंगीत कागदाचें आच्छादनहि लाविलें आहे.' अशा रीतीने प्रभोदय मासिकाचा जन्म झाला. याचे संपादक नारायण शेषाद्री हे होते. हें 'मुंबईमध्यें टामस ग्रेहेम यांणीं छापलें.' याची वार्षिक वर्गणी एक रुपया व नंतर दिल्यास दीड रुपया असून फुटकळ अंकास तीन आणे पडत. याच्या वीस पृष्ठांत चार इंग्रजी व सोळा मराठी असून त्यांत विविध विषयांवर लेख येत. याचा उद्देश 'ईश्वराचें ज्ञान व उपयुक्त विद्या' असे आणि 'आपण बरें करतांना थकूं नये, कारण कीं आपण न थकलो तर यथाकाळीं पीक पावू' हे याचे ब्रीदवाक्य दिले आहे. हे जेमतेम चार वर्षे चालले असावे कारण याचे जानेवारी १८६३ पर्यंतचे अंक उपलब्ध आहेत.

नंतर जानेवारी १८६१ पासून बाबा पदमनजींनी (धाकटी) सत्यदीपिका हे लहान मुलांचे मासिक काढले. याची वार्षिक वर्गणी "अगाऊ दिल्ह्यास सालीना चार आणे. दर अंकास केवळ एक पया किंवा चार पै. यातील विषयहि फार चांगले व लाभदायक असून सुरस भाषेनें लिहिले आहेत. इंग्लंद देशांत 'ख्रिस्तियन वर्नाक्युलर एज्युकेशन सोसैती,' या नांवाची जी परोपकारी मंडळी आहे तिच्या खर्चानें हें पुस्तक निघत असतें व तें छापविण्याची वगैरे देखरेख येथील पुस्तकें व निबंध प्रसिद्ध करणारी

मंडळी करीत असती. मिस्तर बाबा पदमनजी हे या पुस्तकाचे कर्ते आहेत. या मासिकाचा उद्देश : 'तेणेकडून लहान लेकरांस उपयुक्त गोष्टींचें ज्ञान व्हावें व त्यांचीं कोमल मनें सुधरून आतांपासून चांगल्या गोष्टींकडे व देवाकडे लागावीं' असा दिला आहे. ( ज्ञानोदय १-३-१८६१ ). प्रभोदयकर्ते शेषाद्री आपल्या फेब्रुवारी १८६१ च्या अंकात म्हणतात "आम्हांस अनुभवावरून ठाऊक आहे कीं, मिस्तर बाबा लाहान लेंकरांवर विशेष प्रीति करतात म्हणून हे जें काम त्यांवर सोंपिलें आहे तें मोठ्या आनंदानें व हर्षानें ते करतील." खास बालवाचकांकरिता काढलेले मराठीतले पहिलेच बालमासिक म्हणून सत्यदीपिकेकडे बोट दाखविता येईल. यात चंद्रवर्णन, स्पंज, वनस्पती विद्या, ग्रंथ-परिचय, मुलांचे जुगदान असे विविध विषयक लेख असत. या उपयुक्त मासिकाचा शेवटला अंक फेब्रुवारी १८७३ त प्रसिद्ध झाला. त्यात बाबा म्हणतात, "आम्हांस लिहिण्यास अतिशय दुःख वाटतें की ही सत्यदीपिका पुढले महिन्यापासून बंद होईल. हिला द्रव्यापत्तिनामक क्षयाची भावना झाली होती, हें आम्हांस समजलें नाहीं. तिच्या वैद्यानें थोडे दिवसांमागें तिची नाडीपरीक्षा करून सांगितलें कीं ही एक महिन्याचें वर वांचणार नाहीं. असी ही आमची बारा वर्षांची प्रिय कन्या व आमच्या वाचकांची प्रिय बहीण मृत्युपंथाला लागली. हिला नुकताच एक भाऊ झाला व हिचा काळ आला..."

याच वर्षी म्हणजे १८६१ त **सायंदीपिका** या नावाचे एक मासिक उदयास आले. नावापलीकडे या मासिकाची काहीच माहिती हाती आली नाही. हे एक 'ख्रिस्ती मतप्रचारक' मासिक होते असा उल्लेख रा. गो. कानडे यांच्या "मराठी नियतकालिकांचा इतिहास" यात आला आहे, इतकेच.

पुढे १ एप्रिल १८७० पासून **पहारेकरी** या नावाचे एक मासिक मुंबईत प्रसिद्ध होऊ लागले. याचा उल्लेख ज्ञानोदयाच्या १५-४-१८७० च्या अंकात आला आहे. याविषयी नावापलीकडे काही माहिती मिळू शकली नाही.

यानंतर **ऐक्यप्रदर्शकपत्र** या नावाचे त्रैमासिक ऑगस्ट १८७१ त

बाहेर पडले. याचे प्रकाशक गणपतराव रघुनाथ नवलकर असून ते युनियन छापखाना, मुंबई येथे छापून प्रसिद्ध होई. याची वार्षिक वर्गणी रु. १–४–० होती. हे इंग्रजी, मराठी व गुजराथी भाषेत निघे. याचा पहिला अंक लहान अष्टपत्री ७२ पृष्ठांचा असून दर अंकात निदान ४८ पृष्ठे असतील, असे कर्त्याने म्हटले आहे. यात एतद्देशीय ख्रिस्ती लोकांचे स्वदेशाविषयी कर्तव्यकर्म हा मराठी निबंध, सुवचनरूपमाला या सदरात शास्त्रवचनें व सुबोध दिला आहे. "ख्रिस्ती लोकांत बंधुप्रीति वाढावी व धर्मसंबंधी कामांत एकमेकांस साह्य करावें." असा याचा उद्देश होता. बाबा पदमनजी याचे संपादक होते, असे अनुभवसंग्रह भाग २ यावरून दिसते. हे त्रैमासिक सुमारे बावीस वर्षे चालले व डिसेंबर १८९३ त शेवटचा अंक काढल्यानंतर बंद करण्यात आले. या शेवटल्या अंकात म्हटले आहे, 'ईश्वराची इच्छा असली तर मित्रहो, पुनः कधीतरी तुमची आमची अशाच पत्रद्वारें भेट होईल. दयालोभ असावा, हा सलाम." ७ डिसेंबर १८९३ च्या ज्ञानोदयात म्हटले आहे, "ऐक्यप्रदर्शक पत्रिकेस पैशाची अडचण आली नसताहि तिच्या सन्मान्य कर्त्यास वयपरत्वे अशा त्रासापासून विसांवा घेण्याकरितां पत्रिका बंद करावी लागली आहे."

एप्रिल १८७२ पासून आंग्ल संप्रदायी मंडळ्यांचे पहिले मुखपत्र **शुभवर्तमानदर्शक व चर्चसंबंधी नानाविध संग्रह** या लांबलचक नावाने प्रसिद्ध होऊ लागले. या मासिकाचे इंग्रजी नाव "द गॉस्पेलर अँन्ड चर्च मिसलेनी" असून ते इंग्रजी व मराठी भाषेत प्रसिद्ध होई. याचे संपादक कोल्हापूरचे कॅनन टेलर, एस. पी. जी. मिशन हे असून ते एज्युकेशन सोसायटीच्या छापखान्यात छापले जाई. याची वार्षिक वर्गणी आगाऊ १२ आणे व मागाहून १ रुपया असे व किरकोळ अंकास एक आणा पडे. त्यावेळचे मुंबईचे बिशप डॉक्टर हेनरी अलेक्झांडर डग्लस याचा खर्च भागवीत. यात येणारे ख्रिस्ती महामंडळाच्या इतिहासाचे लेख खुद्द बिशप लिहीत असत. १८७६ च्या सुरवातीस हें त्रैमासिकही बंद पडले.

सत्यदीपिकेनंतर खास मुलांकरिता म्हणून जानेवारी १८७३ पासून "**मुलांचा भाग**" ज्ञानोदयाची पुरवणी म्हणून निघू लागला. "आपल्या

लेकरांस चांगल्या वाचनाची गोडी लावू इच्छिणाऱ्या आईबापांनीं घ्यावें" असे यात सांगितले आहे. याविषयी लिहिताना बाबा पदमनजी म्हणतात; 'ह्या वर्षाच्या आरंभीं सत्यदीपिकेला एक भाऊ झाला, ही गोष्ट लिहिण्यास आम्हांस आनंद वाटतो त्याचें नांव "मुलांचा भाग" हें बाळ लहान असल्यामुळें चार पायांवर ( दोन हात व दोन पाय ) रांगतें, म्हणजे याचीं चारच पृष्ठें निघतात व तें ज्ञानोदयाच्या कडेवर बसलेलें असतें, म्हणजे ज्ञानोदयाच्या बरोबर त्याच्या पुरवणीदाखल तें बाहेर पडतें... ज्ञानोदय घेणारास त्याबद्दल कांहीं जास्ती खर्च पडत नाहीं. हें सांप्रत महिन्यांतून एकदांच निघणार' (धाकटी सत्यदीपिका–फेब्रुएरी १८७३). याच्या पहिल्या संपादिका मिसेस् सी. डब्ल्यू. पार्क या होत्या. मनोरंजक गोष्टी, कविता, पशुपक्ष्यांची सचित्र व उपयुक्त माहिती ही याची वैशिष्ठ्ये होती. जानेवारी १८७६ पासून ज्ञानोदयाची ही पुरवणी बालबोध मेवा या नावाने प्रसिद्ध होऊ लागली. याची आठ पाने असून किमत अर्धा आणा असे. हा 'अमेरिकन मराठी मिशन व क्रिसचियन वर्नाक्युलर एजुकेशन सोसैटी यांनीं प्रसिद्ध केला.' पहिल्या अंकात 'मुलांचा भाग' या शीर्षकाखाली म्हटले आहे, "मुलांच्या भागानें ह्या नव्या वर्षी आपला जुना पोषाक व आपलें नांव बदललें आहे. आणि आतां 'बालबोध मेवा' ह्या नांवानें हें पत्र तुम्हाला फार सलाम करितें, व तुम्हाला हें नवें वर्ष केवळ आनंदाचें व्हावें असी त्याची इच्छा आहे." डिसेंबर १९१० पर्यंत बालबोध मेवा सतत अडतीस वर्षे सुरळीत चालला होता व त्याला महाराष्ट्रात मुलांचे उच्च दर्जाचे मासिक म्हणून मान मिळत होता. नंतर मात्र द्रव्याभावी ते बंद पडले. पुढे १९२४ त डॉ मिस बिसल यांनी त्याचे पुनरुज्जीवन केले पण १९४२ नंतर ते कायमचेच बंद पडले.

मार्च १८७३ त बाबा पदमनजी यांनी आपली थोरली सत्यदीपिका सुरू केली. यात मराठी बरोबरच काही इंग्रजी लेख, कविता वगैरे येत. हिंदु, जैन, बुद्ध धर्म व तत्त्वज्ञान विषयक लेखही यात येत. मलपृष्ठ चारवर पुढीलप्रमाणे नमूद केले आहे; "हें पुस्तक दर महिन्यास निघत जाईल. ह्याची वर्षास आगाऊ किंमत रु. २–०. फुटकळ अंकास आणे

०-३. बाहेर गावचे वर्गणीदारांस टपाल खर्च पडणार नाहीं.... ह्याबद्दल कोणास कांहीं लिहून पाठविणें असल्यास 'पुणें एथें लष्करांत सोलापूर बाजारांत सत्यदीपिकेच्या कर्त्यास,' असा पत्ता लिहून टिकिट लावून पत्र पाठवावें. ह्यांत कादंबऱ्या (नावेल्स) खेरीज करून चांगलीं पुस्तकें विकण्याच्या जाहिराती स्वस्त दरानें छापिल्या जातील." याच्या वर्गणी-दारांत हिंदी ख्रिस्ती मंडळीबरोबरच परदेशीय सरकारी अधिकारी व मिशनरी व रा. ब. नाना मोरोजी, दादोबा पांडुरंग, महादेव गोविंद रानडे अशीही नावे आढळतात. बाबांची ही सत्यदीपिका पहिली दोन तीन वर्षे ठीक चालली होती. जानेवारी १८७५ च्या अंकात ते म्हणतात, 'सत्यदीपिकेला येत्या मार्च महिन्यांत तिसरें वर्ष लागेल तरी अद्याप दुसऱ्या वर्षाची वर्गणी कित्येकांकडून आली नाहीं." प्रत्येक अंकात ते वर्गणीची पोच देत.

मार्च १८७६ त ते म्हणतात "कित्येक तर दोन दोन तीन तीन वर्षें त्यांचे अंक टपाल मार्गे घेऊन स्वस्थ ढेकर देत बसले आहेत. त्यांच्या हातून वर्षाचे दोन रु. देखील सुटत नाहींत. दुसऱ्याच्या मेहनतीचा व दुसऱ्याच्या मालाचा अभिलाष करणें त्यांना बरें वाटतें!" पुढे सप्टेंबर १८७६ त त्यांनी सुमारे ४० वर्गणीदारांना पत्रे पाठविली पण त्याला योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही या महिन्याच्या अंकात ते म्हणतात, "असेंच पुढें होईल तर आम्हांला हें पुस्तक बंद करावें लागेल. दर वर्षास तोटा सोसून छापखान्याचा खर्च चालविण्याचें आम्हांस सामर्थ्य नाहीं." डिसेंबर १८७६ त ते विचा-रतात "दुष्काळ पडला म्हणून हें पुस्तक बंद करावें किंवा वर्गणी बरोबर पोंचत नाहीं म्हणून बंद करावें?" आजकालच्या संपादकाप्रमाणेच बाबांनाही त्या काळी असा अनुभव आला. शेवटी डिसेंबर १८७७ च्या शेवटच्या अंकात ते म्हणतात, "आतां पुढें वारंवार वर्गणीचा गिल्ला त्यांच्या कानीं पडावा यापेक्षां आपलें पुस्तक बंद करावें हाच आम्हांस हल्लीच्या परि-स्थितींत उत्तम मार्ग दिसतो. पुण्यांत राहात असता दर वर्षास आम्ही या पुस्तकानिमित्त द्रव्याचा तोटा सोसीत आलो, परंतु मुंबईच्या वस्तींत कुटुंबाचा चरितार्थ चालवून अशा प्रकारची घस सोसण्याची आम्हांस शक्ति नाहीं." अशा रीतीने सत्यदीपिका मालविली गेली. याबाबत लिहिताना

ज्ञानोदयकार म्हणतात, " आणखी ख्रिस्ती लोकांत असें मासिकपत्र असण्याची फार जरुरी आहे. कित्येक गोष्टी अशा आहेत कीं; त्या ज्ञानोदयासारख्या साप्ताहिक पत्रांत घेतां येत नाहींत व घेतल्याच तर त्यांविषयीं यथायोग्य रीतीनें लिहिणें होत नाहीं. " ( ज्ञानोदय १३-१२-१८७७ )

सोसायटी ऑफ सेंट जॉन द इव्हांजेलिस्ट या संस्थेचे काही फादर्स किंवा आचार्य १८७४ त इकडे आले. त्यांनीही एक मासिक काढले होते. ते डिसेंबर १८७६ पर्यंत चालू होते असे समजतें. ११ जानेवारी १८७७ च्या ज्ञानोदयात लिहिले आहे, " एथें कौली फादर लोक एक धर्मासंबंधी मासिक पुस्तक काढीत होते तें चालू महिन्यापासून बंद झालें, असें समजतें. "

यानंतर १८७७ त घोडनदीचे शेख उमर यांनी अहमदनगरास मान्ना या नावाचे एक मासिक सुरू केले. अमेरिकन मराठी मिशनातील एक धडाडीचा निष्ठावंत कार्यकर्ता असा शेख उमर यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. यांनी उर्दू, फारशी व अरबी भाषांचा अभ्यास मुनशी मौलवींजवळ केला. पुढे १८६५ त त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला व इंग्रजी आणि मराठीचे ज्ञान मिळविले. त्यांनी मराठीत काही पुस्तके देखील लिहिली. त्यांनी काढलेल्या मान्ना मासिकाचा पहिला अंक मार्च १८७७ त बाहेर पडला. याची अष्टपत्री आकाराची चार पृष्ठे असत. पुढे सप्टेंबर १८७७ पासून सहा पृष्ठे करण्यात आली. याचे मूल्य दर अंकास एक पैसा असे. हे वर्तमानपत्र नसे. " ख्रिस्ती लोकांस शब्बाथदिवशीं वाचण्याजोगे विषय मिळून शास्त्र संबंधी व दुसरी उपयुक्त माहिती मिळावी हा त्याचा उद्देश " असे. (ज्ञानोदय २७-६-१८७७) याची वार्षिक वर्गणी ३ आणे असून ते दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी प्रसिद्ध होत असे. पुढें २ नोव्हेंबर १८७८ च्या एका पत्रात संपादक म्हणतात, "सप्टें-आक्टो-नोव्हें १८७७ चे अंक छापले नाहीत कारण अनेकदा जाहिराती देऊनहि बऱ्याच वर्गणीदारांनी गेल्या व चालु वर्षाचीहि वर्गणी दिली नाहीं. कांहीं युरोपियन व अमेरिकन गृहस्थांचें साहाय्य आम्ही घरगुती रीतीनें मागितलें. त्यांतीलहि केवळ थोडक्यांकडूनच आम्हांस सहाय मिळालें म्हणून सामर्थ्य नसल्यामुळें सध्या मान्ना पत्राचे अंक आम्ही छापविले नाहीत... पुरतें सहाय मिळाल्यावर ते माजी पडलेले

तिन्ही अंक प्रथम छापून आम्ही आपलें काम पुन्हा चालू करू." बरीचशी झीज सोसून त्यांनीं ते स्वतःच्या हिंमतीवर चालविले. प्रसंगविशेषी त्यांनीं घरातले सामानदेखील विकले होते. २७ मार्च १८८१ रोजी शेख उमर मरण पावले तेव्हा हेहीं मासिक बंद पडले.

डिसेंबर १८७९ पासून प्रकाशता या नावाचे एक मासिक एस्. पी. जी. मिशनतर्फे अहमदनगर येथे सुरू करण्यात आले. याचे पहिले संपादक टी. विल्यम्स हे होते. यात प्रथम पंचांग, ख्रिस्ती शास्त्राचा अचूकपणा, स्थिरीकरण म्हणजे काय, चर्च इतिहास, अपास्टलांचा काळ, उपदेशसंबंधी, शिकविण्याचे नियम, व्याकरणसंबंधी, वगैरे विषय असत. मिशन कामदारांना धर्मसंबंधी शिक्षण देण्याचा याचा मूळ हेतू होता. अहमदनगर येथे मिशनात काम करणाऱ्या प्रत्येकाला यातील लेखांचा अभ्यास करावा लागे. दर महिन्याला त्याची परीक्षा घेण्यात येई. त्यातल्या एखाद्या विषयात, कुणी नापास झाला तर त्याला जबर दंड भरावा लागे. असे कॅनन किंग मुंबई धर्मप्रांताच्या इंग्रजी मासिकाच्या एप्रिल १९२० च्या अंकात लिहितात. विल्यमस् नंतर टलर, किंग, दिनकरराव रा. आठवले, ए. टी. सोनावणे वगैरेंनी याचे संपादन केले. 'कॅथॉलिक सिद्धान्तांची ख्रिस्ती लोकांस ओळख करून देणें' हा याचा उद्देश असे.

पहिल्या महायुद्धाच्या काळात ते बंद पडले व नंतर पुन्हा चालू झाले होते. मध्यंतरी ते प्रकाशक व प्रकाष्ठा या नावानेही प्रसिद्ध होत होते. सुमारे साठ वर्षांनंतर हे मासिक बंद पडले.

१८८० मध्ये ज्ञानोदयात शब्बाथ शाळेच्या धड्यावर टीका छापून येत. त्या दर महिन्यास निराळ्या छापून काढण्याचे १-७-१८८० च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आले होते. ज्ञानोदयाच्या आकाराची ८ पृष्ठे यात असून वार्षिक वर्गणी १ रुपया व बारा प्रतीस १० रुपये ठेवली होती. शाब्बाथ शाळेतील शिक्षकांना, शास्त्राभ्यास करणारांना व शिकविणारांना या उपयुक्त असल्याचे म्हटले आहे. सी. डब्ल्यू. पार्क, मुंबई यांच्याकडे त्या मिळत. याचे वर्गणीदार फारच थोडे होते. १८८१ पासून अहमदनगर येथे छापून बिसल यांचेकडे मिळू लागल्या. पुढे १८९३ त याच टीका बहुधा 'बाळशिक्षका'त सामील करण्यात आल्या.

२ फेब्रुवारी १८८२ रोजी रेव्ह. बाबा पदमनजी यांनी **सत्यवादी** या नावाचे एक पाक्षिक मुंबईत सुरू केले. याची आठ पृष्ठे असून वार्षिक वर्गणी एक रुपया असे. १६–३–१८८२ च्या ज्ञानोदयात याच्या तीन अंकांची पोच आली आहे. याविषयी लिहिताना संपादक म्हणतात "याची भाषा फार चांगली आहे. ... हें ख्रिस्ती व इतर लोकांसाठीं काढलें आहे. म्हणून यांत ख्रिस्ती लोकांच्या व तसेंच इतर लोकांच्या उपयोगी पडण्याजोगें विषय येतील. किरकोळ वर्तमानांची भरती विशेष केली जाणार नाहीं. ... आजवर सत्यवादीत जे विषय आले ते बहुतेक फार रसिक, मनोरंजक व उपयुक्त आहेत पहिल्या अंकांत पश्चिम महाराष्ट्र देशांतील नवीन ख्रिस्ती मंडळीचें फार चांगलें व यथातथ्य वर्णन केलें आहे. पुढें अलीकडे झालेल्या व्याख्यानांविषयीं जो मजकूर लिहिला आहे त्यांत दयानंद सरस्वती यांस अहिंसा धर्माविषयीं समर्पक उत्तर दिलें आहे." हे केव्हा बंद पडले याविषयी अधिक माहिती मिळू शकली नाही.

दि. १९ सप्टेंबर १८८२ रोजी मुक्ति फौज किंवा साल्वेशन आर्मी यांचे चार मिशनरी मुंबई बंदरात उतरले. त्यानंतर दोनच महिन्यात म्हणजे नोव्हेंबर १८८२ पासून त्यांनी **मुक्ति समाचार** हे मराठी वर्तमानपत्र सुरू केले. ३० नोव्हेंबर व ७ डिसेंबर १८८२ च्या ज्ञानोदयाच्या अंकात मुक्ति समाचारमध्ये प्रसिद्ध झालेल्या कविता उतरून घेतलेल्या आहेत. हे किती दिवस चालले व केव्हा बंद पडले वगैरे कोणताच तपशील मिळत नाही.

पुढे बॉम्बे ट्रॅक्ट अॅन्ड बुक सोसायटी तर्फे **कुटुंबमित्र** या नावाचे एक मासिक जानेवारी १८८४ पासून सुरू झाले. याचे संपादक बी. ब्लेक हे होते. याची वार्षिक वर्गणी रु. १-८-० असून फुटकळ अंकास २ आणे पडत. अंकात २४ पृष्ठे असत. जानेवारी १८८४ च्या प्रथमांकातील 'प्रस्तावने'त लिहिले आहे, "विलायतेप्रमाणें हिंदुस्थानांत मासिक पुस्तकांचा प्रसार व्हावा व मराठी वाचकांस नाना प्रकारच्या विषयांचें ज्ञान व्हावें ह्याकरितां मुंबईतील ट्राक्ट व बुक सोसैटी ह्या मंडळीनें 'कुटुंबमित्र' नांवाचें प्रस्तुत मासिक पुस्तक काढलें आहे.

नावाप्रमाणेंच हें पुस्तक खरोखरीच अनेक कुटुंबांचें साहाय्य करील अशी आमचीं पूर्ण खात्री आहे. हें पुस्तक दर महिन्यास छापून प्रसिद्ध होईल. ... प्रसिद्ध पुरूष व स्त्रिया यांचीं चरित्रें, प्राचीन काळच्या लोकांच्या रीतीभातीविषयींची माहिती, सांप्रतकाळच्या लोकांचे रिवाज, सृष्टिज्ञानाची वृद्धि व्हावी ह्यासाठीं पदार्थविज्ञानशास्त्रसंबंधी माहिती, शब्बाथ शाळांस उपयोगी पडण्यासारखे वाचनपाठ, नाना प्रकारच्या मनोवेधक व बोधपर गोष्टी आणि चुटके इत्यादी विषय या मासिक पुस्तकांत येत जातील." पहिल्याच अंकापासून 'प्रेसिडेंत गारफिल्ड यांचें चरित्र' क्रमशः देण्यात येऊं लागले. हे सचित्र मासिक असून त्यात लघुकथा, कविता, पशुपक्ष्यांची रेखाचित्रें व माहिती, बातम्या वगैरे असत. पुढे एप्रिल १८८५ च्या अंकात लिहिले आहे, "ह्या अंकापासून याच्या एडिटराचें काम त्या सोसैटीनें आपले मराठी एडिटर मि. बाबा पदमनजी यांजकडे सोंपिलें आहे व त्यांस विषयांचा पुरवठा करण्याकरितां चौघा गृहस्थांची योजना केली आहे." परंतु जेमतेम तीन वर्षे चालून ते डिसेंबर १८८६ नंतर बंद पडले.

त्यानंतर आक्टोबर १८८५ पासून **राजमार्ग** हे एक नवीन मासिक उदयास आले. याच्या पहिल्या अंकाची पोच ८ आक्टोबर १८८५ च्या ज्ञानोदयात दिली आहे. याचे नाव प्रथम '**स्वर्गमार्ग**' असल्याचे समजते. दोन तीन अंक काढल्यानंतर हे बंद पडले आणि एप्रिल १८८६ पासून पुन्हा सुरू झाले. या अंकात पवित्रता नम्रतेनें गाजविणें, धर्मसंजीवन, तारण, पूर्ण पवित्रता, धर्मसंबंधी अनुभव, पवित्रतेसंबंधी सात प्रार्थना या विषयावर लेख आहेत. मासिकाबाबत मराठी पत्रव्यवहार सुमंत विष्णु करमरकर यांच्याशी करावा, असे सांगितले आहे. पवित्रता प्रसारक मंडळीने या पत्रासंबंधी एक व्यवस्थापक मंडळी नेमली होती. या पत्राबाबत राजमार्गस्थ या सहीनिशी ज्ञानोदयाच्या ६-५-१८८६ च्या अंकात एक तक्रारवजा पत्र प्रसिद्ध झाले होते. त्यात लेखक म्हणतो, "राजमार्ग हें पत्र कांहीं पूर्ण म्हणविणारे मनुष्य चालवीत होते. पण दोनतीन अंक निघाल्यावर काय झालें कोण जाणे! त्यास कुंभकर्णी झोप लागली व आतां तें पुन्हां जागृत झालें. त्याचें पूर्वीचे एडिटर आणि फेथ मिशन सबंधानें लिहिणारे

एडिट्रेस यांचीं नांवें पुनर्जीवनामध्यें कां वगळलीं याचा खुलासा कांहींच केला नाहीं ... कित्येकांनीं एक वर्षाची वर्गणी भरली होती, पण पहिले दोनतीनच अंक मिळाले म्हणून याचा व पूर्वीच्या एडिटरांचा कांही संबंध आहे कां हें वर्गणीदारांस कळणें अवश्य आहे." तरी पण या मासिकाबाबत काही खुलासा झाला किंवा नाहीं व हे केव्हा बंद पडलें हे कळले नाही.

यानंतर कारवार येथून **सुमंत** या नावाचे एक नवीन मासिक उदयास आले. याचे संपादक कोण होते हे समजले नाही, पण कारवारच्या कोणा ख्रिस्ती बंधूने ते काढले होते एवढेच नमूद आहे. याचा पहिला अंक जानेवारी १८८८ त बाहेर पडला. हा शिळा छापात असून चार पृष्ठांचा होता. "कोणत्याही मिशनच्या आधाराशिवाय स्वतंत्रपणें हें पत्र चालवावें" अशी या संपादकाची इच्छा होती. हे खास ख्रिस्ती लोकांसाठी असून त्याच्या पहिल्या अंकात प्रॉटेस्टंट नेटिव्ह ख्रिस्ती, ख्रिस्ती तरुणांचें कर्तव्य, वालंटियर कोर वगैरे लेख व वर्तमानसार होते. या नियतकालिकाविषयी २३ फेब्रुवारी १८८८ च्या ज्ञानोदयात कोणा "क्ष" ने म्हटले आहे. "... नुकतेंच एक कारवारी पिल्लूं बाहेर पडलें आहे, यावरून मोठा आनंद वाटतो. परंतु हें छोटेखानी पत्र आपली कारवारी मराठी बदलून दादोबांच्या थोरल्या व्याकरणाच्या नियमांस अनुसरून दक्षिण मराठीं भाषा लिहित व विषयांच्या प्रतिपादनांत अधिक काळजी घेईल तर लवकर उशीरा हें बरेंच उपयोगी पडेल अशी आशा आहे." स्वतंत्रपणें मासिक चालविण्याचा हा संपादकांचा प्रयत्न कितपत यशस्वी झाला हे समजले नाही कारण लवकरच हे नियतकालिक नामशेष झाले.

ज्ञानोदयाच्या खालोखाल दीर्घायुष्य लाभलेले व अद्याप चालू असलेले मासिक म्हणून **सिंहनाद** या मासिकाचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. मुक्ति फौज किंवा साल्व्हेशन आर्मीचे हे मुखपत्र जानेवारी १८८९ पासून सुरू झाले. मात्र या नावाचे मासिक ( इ. स. १८८२ चे ) सरकारी यादी ( १९४६–५० ) व रजिस्ट्रारच्या १९५८ च्या अहवालात नमूद केले आहे. यावरून कदाचित् मुक्ति समाचार या १८८२ च्या नियतकालिकाचे नामांतर करून सिंहनाद हे नवीन नाव देण्यात आले असावे. असे असले

तर आज सिंहनाद या मासिकाने शतक गाठले असे म्हणता येईल. सिंह-नादाच्या संपादिका प्रथम कर्नल युद्धाबाई या होत्या. मुक्तीच्या संदेशाचा प्रचार करणे हा या मासिकाचा उद्देश आहे.

जागल्या आणि धांडोरा ही आणखी दोन नियतकालिकें या काळात उदयास आली होती असे दिसून येते. पण ती केव्हा निघाली, कुठे निघाली, किती दिवस चालली आणि त्यांचे संपादक, प्रकाशक कोण, वार्षिक वर्गणी वगैरे किती इत्यादी काहीच तपशील मिळत नाही व त्यांचा मागमूसही लागत नाही.

पुढे १८९० च्या फेब्रुवारीत पुण्यातल्या काही तरुणांनी दिव्यप्रकाश हे नवीन मासिक सुरू केले. याची वार्षिक वर्गणी १२ आणे होती. याविषयी लिहिताना १८९० त ज्ञानोदयकार म्हणतात, "यापूर्वी सत्यदीपिका, सत्यवादी, कुटुंबमित्र नांवाचीं उपयुक्त मासिकें निघत होतीं पण त्यांस ख्रिस्ती लोकांचा आश्रय मिळावा तसा मिळाला नाहीं... पहारेकरी, जागल्या, सुमंत, धांडोरा हीं व अशा प्रकारचीं अनेक वर्तमानपत्रें वर्ष सहा महिने किंवा एकदोन अंक काढून बंद पडावीत यापेक्षां तें व्यर्थ खर्च न करता या ज्ञानोदय पत्राच्या प्रती गरीब लोकांस किंवा लैब्ऱ्यांमधून स्वस्त किंवा अर्ध किंमतीला त्या मित्रांनीं दिल्यास त्यांच्याच पैशानें मोठा फायदा होऊन जनहित करण्याची त्यांची जी महदीच्छा तीं तृप्त होणार नाहीं कां !" हे दिव्यप्रकाशही लवकरच संपुष्टात आले असे दिसते.

१८९२ किंवा त्याच्या आसपास सूर्यप्रकाशक या नावाचे एक पत्रक निघत असे. पण त्याविषयी अधिक माहिती मिळत नाही.

याशिवाय मेथडिस्ट चर्चचे मुंबईतले आचार्य, सूर्यप्रकाश या साप्ताहि-काचे संपादक आहेत असे हॉलिस्टर यांच्या 'सेंटिनरी ऑफ द मेथडिस्ट चर्च इन सदर्न एशिया' (१९५६) या ग्रंथात 'मराठी वर्क' या सदरात (१८९२ व ९३ च्या अहवालांवरून) नमूद केले आहे.

ही दोन्ही प्रकाशने एकच किंवा कसे याविषयी माहिती मिळू शकली नाही. कदाचित शब्बाथशाळांसाठी ही छापण्यात येत असावीत.

बेने-इस्राएल समाजात, विशेषतः कोकणपट्टीत यावेळेस कौली फादर्स (एस. एस. जे. ई.) काम करीत असत. त्यांत जेम्स हेनरी लॉर्ड हे प्रमुख असत. यांनी खास बेने इस्राएल लोकांसाठी मबास्सेर या नावाचे एक मासिक मार्च १८९२ त सुरू केले. या मूळ हीब्रू शब्दाचा अर्थ 'सुवार्तिक' असा आहे. "हें पत्र सुरू करण्याचें कारण हेंच कीं आम्ही ख्रिस्ती असल्यामुळें बेने-इस्राएल मित्रांस कळविण्याकरितां देवानें आम्हांस एक निरोप सोंपीला आहे. तो त्यांच्या राष्ट्राच्या प्राचीन आशेचा म्हणजे येणाऱ्या मशीहासंबंधींचा व त्याकडून प्राप्त होणाऱ्या सुखदायक कालाविषयीचा असून कुशलाचा आहे ; आणि तो त्यांस कळवावा म्हणून ईश्वरानें आम्हां ख्रिस्ती लोकांस आज्ञा दिली आहे. यामुळें आमच्या या पत्रांत ज्या विषयांचें प्रतिपादन आम्ही करीत जाऊं तें हेंच कीं जुन्या करारांतील शास्त्राचा खरा अर्थ व मजकूर आणि विशेषकरून मशीहासंबंधीं त्यांची पूर्णता ... 'नियमशास्त्र विधान ह्यांच्या सांगण्याप्रमाणे,' हें वाक्य जणु काय आमच्या पत्राचें निशाण होईल.... मुख्य विषयाशिवाय कधीं कधीं आमच्या इस्राएल मित्रांकरितां कांहीं उपयुक्त व मनोरंजक गोष्टी लिहिण्याचा आम्ही प्रयत्न करूं." असे याच्या प्रथमांकात म्हटले आहे. प्रत्येक अंक षोडश पत्री ८ पृष्ठांचा असे. किरकोळ अंकास ३ पै पडत आणि वार्षिक वर्गणी ३ आणे असे. हे एज्युकेशन सोसायटीच्या छापखान्यात छापीत. पत्राची भाषा मराठी असे पण शास्त्रवचने हीब्रू भाषेतही देण्यात येत. काही वर्षांनंतर हे मासिक अनियमितपणे निघू लागले. १९०३ त याचा एकच अंक बाहेर पडला. १९०४ मध्ये दोन निघाले आणि १९०५ मध्ये तर अजिबात बंद पडले. याचे कारण हे मासिक काढायला कुणाची मदत मिळेना. इतर कामाच्या गडबडीत संपादकांना याकडे लक्ष द्यायला फुरसत मिळेना आणि बरीचशी खटपट करून अंक काढला तरी त्याचा फारसा उपयोग होत असल्याचे दिसेनासे झाले होते.

येथवर खास स्त्रियांकरिता म्हणून एकही नियतकालिक निघाले नव्हते. ते प्रथम काढण्याचा मान 'स्त्रियांची मैत्रीण' या मासिकाने पटकावला. हे मासिक मेथडिस्ट एपिस्कोपल चर्चच्या परदेशीय स्त्री-मिशनरींनी १८९३ त

काढले. गृहशिक्षण, मुलांचे संगोपन, बोधपर लेख वगैरे स्त्रियांना उपयुक्त अशा विषयांवर यात लिखाण व गोष्टी असत. याची वार्षिक वर्गणी बारा आणे व किरकोळ अंकास एक आणा असे. पुढे मे १९४० त याचा ४/५ अंक प्रसिद्ध झाला. जूनचा अंक निघाला नाही. जुलै १९४० पासून ज्ञानोदयात दोन पाने पुरवणी म्हणून प्रसिद्ध होऊ लागली. नंतर डिसेंबर १९४२ पर्यंत चालून हे बंद पडले.

या काळात शब्बाथ शाळेच्या मराठी शिक्षकांना अवश्य ते मार्गदर्शन करणारी पुस्तके नव्हती. ही उणीव डॉ. एस. बी. फेअरबँक यांच्या नजरेस आली होती. तेव्हा ज्ञानोदय साप्ताहिकाबरोबर एक मासिक पुरवणी छापून त्यांनी ही अडचण दूर केली. ही पुरवणी त्यांनी सप्टेंबर १८९२ पासून देण्यास सुरवात केली. १८९३ च्या सुरवातीला मुंबईच्या 'संडे स्कूल युनीयन' ने डॉ. फेअरबँक यांच्या टिप्पणांच्या प्रकाशनाचा बोजा उचलला. नंतर ऑगस्ट १८९३ मध्ये शब्बाथ शाळेच्या या टिप्पणांबरोबर, चित्रे, लघुकथा, बोधवचने आणि काव्ये घालून 'बाळशिक्षक' या नावाचे एक साप्ताहिक सुरू करण्यात आले. बॉम्बे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटीने छपाईचा व प्रकाशनाचा सारा खर्च करण्याचे मान्य केले. दोन मिशन संस्थांखेरीज इतर सर्व मंडळ्यांतून या साप्ताहिकाचा उपयोग केला जात असे. १०० प्रतींची किंमत ५ आणे व २५ प्रतींना वर्षाला रु. ४-१-० पडे. ही किंमत म्हणजे पत्रिका पाठवायचा व टपाल हशीलाचा खर्च भागण्यापुरती असे. या अगोदर निघालेली 'सूर्य प्रकाशक' व 'शब्बाथ शाळेच्या धड्यावर टीका' ही दोन्ही पत्रके 'बाळशिक्षका'त सामील करण्यात आली होती. या वेळेस बाळशिक्षकाच्या एका आण्याला सहा प्रती मिळत. पुढे ३१ मे १८८८ रोजी डॉ. फेअरबँक वारले. तेव्हा सुमंत विष्णु करमरकर, बाळशिक्षकाचे संपादक झाले. १९०६ पर्यंत ते चालू होते. १९०६ त करमरकर रंगूनला एका परिषदेस गेले व तदनंतर बाळशिक्षकाचे नाव ऐकू येईनासे झाले तेव्हा ते १९०६ पासून बंद पडले असे अनुमान करता येते.

यानंतर जानेवारी १८९४ त सन्मित्र या नावाचे एक मासिक मुंबईच्या काही ख्रिस्ती तरुणांनी काढले. हे बॉम्बे ख्रिश्चन फ्रेंडली युनियन

( किंवा, ख्रिस्ती भावांचा मेळा ) या संस्थतर्फे निघाले होते. हे लवकरच बंद पडले असावे कारण याचा नंतर कोठेच उल्लेख सापडत नाही.

चर्च मिशनरी सोसायटीतर्फे सुवार्तिक हे मासिक जानेवारी १८९८ पासून निघू लागले. जागतिक ख्रिस्ती धर्मविषयक बातम्या तसेच स्थानिक सी. एम. एसच्या बातम्या देणे आणि सुवार्ता प्रचारासाठी उपयुक्त सूचना वगैरे देणे, असे या मासिकाचे प्रमुख हेतू होते. या पलीकडे या मासिकाची माहिती मिळू शकली नाही.

पुढे ऑगस्ट १८९९ त एतद्देशीय ख्रिस्ती लोकांचा कैवारी या नावाचे एक मासिक मुंबईच्या इंडियन ख्रिश्चन युनियनतर्फे प्रसिद्ध होऊ लागले. यातला काही मजकूर इंग्रजीत असावा असे २८ सप्टेंबर १८९९ च्या अंकावरुन दिसते. याचे संपादक दिनकर बाबा पदमनजी हे होते, असे ज्ञानोदयातील उल्लेखावरुन दिसून येते. तसेच याच्या सप्टेंबर १८९९ च्या म्हणजे दुसऱ्याच अंकात मुंबईतल्या एका मिशन चर्चवर टीकेची झोड उठविण्यात आली होती. याची वार्षिक वर्गणी किंवा फुटकळ अंकाची किंमत काय होती हे कळले नाही. परंतु जानेवारी १९०१ पासून मात्र हे विनामूल्य मिळू लागले. ७ फेब्रुवारी १९०१ च्या ज्ञानोदयात याची जाहिरात अशी दिली आहे. " हे पत्र दर महिन्यास नेमानें चार पेजी निघत जाईल व ज्या कोणास या पत्राचें वर्गणीदार होण्याची इच्छा आहे त्यांनीं मि. एरन वासकर, म्यानेजर कैवारी पत्र, ट्रीचर कंपनीसमोर, भायखळचावरील धर्मशाळा या पत्त्यावर टपाल हंशीलाबद्दल फक्त ३ तीन आण वर्गणी पाठवावी म्हणजे कैवारी पत्र मोठ्या संतोषानें त्यांच्या सेवेस सादर होत जाईल."

या शतकातले शवटले ख्रिस्ती नियतकालिक ख्रिस्ती या नावाचे असून ते नारायण वामन टिळक यांनी सप्टेंबर १९०० पासून अहमदनगर येथें सुरु केले. शेख उमर यांनी काढलेल्या मान्ना या मासिकाकडून टिळकांना स्फूर्ती मिळाली होती. यात ख्रिस्ती जिण्याचा निबंध, पवित्र शास्त्रावर टीकात्मक लेख, कविता, चरित्रे वगैरे येत असत. ख्रिस्तीतर जनतेतही हे वाचले जावे असा याचा हेतू होता. मिशनाकडून काहीही द्रव्य-

सहाय्याची अपेक्षा न करता टिळकांनी ते स्वतःच्या जबाबदारीवर काढले होते. याच्या किरकोळ अंकाची किंमत पाऊण आणा ठेवली होती आणि वार्षिक वर्गणी आठ आणे होती. १ सप्टेंबर १९०१ पासून याचा आकार दुप्पट करण्यात आला. याची एक दोन पाने इंग्रजीत देण्यात येऊ लागली होती. परंतु या मासिकास मिळावा तसा लोकाश्रय न मिळाल्याने ते १९०२ नंतर बंद पडल्याचे समजते.

❋

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८८३
२३२८९
निबंध
५५८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# मराठी ख्रिस्ती नियतकालिके

## खंड २ रा : १९००–१९५०

या शतकातले पहिले नियतकालिक म्हणजे १९०१ साली निघालेले **विवेचक** हे होय. इंडियन ख्रिश्चन असोसिएशन, मुंबई, या संस्थेचे हे त्रैमासिक होते. संस्थेच्या कार्याची जनतेला माहिती व्हावी म्हणून तिने १८९८ त प्रथम एक जाहिरातवजा पत्रक सुरू केले होते पुढे १८९९ त ते मासिक पत्र म्हणून निघू लागले. त्यांत सभासदांसाठी दरमहा लेख व जाहिराती येत. नंतर १९०० त त्याचा आकार वाढवून ते त्रैमासिक करण्यात आले. याचे नाव 'इंडियन ख्रिश्चन त्रैमासिक' असे असून हे इंग्रजी व मराठी भाषेत निघे. १९०१ पासून ते विवेचक या नावाने दोन महिन्यातून एकदा निघू लागले व कालांतराने बंद पडले. याचे संपादक एन्. जी. वेलिणकर आणि सुमंत विष्णु करमरकर हे होते. दर अंकाची किंमत ६ पै असे. मुंबईतील ख्रिस्ती समाजाच्या आशा आकांक्षा, विचार वगैरे जनतेपुढे मांडणे हे याचे ध्येय होते.

यानंतर एप्रिल १९०३ पासून 'नगर जिल्ह्यातील काथोलिकांच्या शिक्षणासाठी व धर्मप्रसारासाठी' **निरोप्या** या नावाचे एक मासिक राहुरी तालुक्यातील वळण येथून प्रसिद्ध होऊ लागले. रोमन कॅथलिक बंधूंनी काढलेले हे पहिलेच नियतकालिक. याचे संपूर्ण नाव 'येशू हृदयाचा निरोप्या असे आहे. याचे संस्थापक व पहिले संपादक हेनरी डोरींग ये. सं. (१९०७ पासून पुण्याचे आर्च बिशप) हे होते. १९१४ पर्यंत संपादन केल्यानंतर ते रोमला गेले. मध्यंतरी म्हणजे मार्च १९०९ ते मे १९१० पर्यंत फ्रान्सिस त्रैंकॉप, ये. सं. हे संपादक होते. १९१४ त डोरींग रोमला गेल्यानंतरही 'त्रैंकापनी निरोप्या लिहिला' असे डिसेंबर १९३२ च्या निरोप्यात म्हटले आहे. पहिल्या महायुद्धाच्या काळात त्याचे प्रकाशन स्थगित करण्यात आले. पुढे

१९२७ त डोरींग पुण्यात आले व जून १९२८ पासून निरोप्या पुन्हा प्रसिद्ध होऊ लागला. हे धार्मिक व सामाजिक स्वरूपाचे मासिक असून यात विविध विषयांवरील लेख, कविता, मंडळ्यांच्या हालचाली वगैरे मजकूर येत असतो· याची वार्षिक वर्गणी रु. ३ असून किरकोळ अंकाची किंमत ३० पैसे आहे.

शंकर बळवंत कुलकर्णी व मनोहर विठ्ठल तर्खडकर या दोघा ख्रिस्ती कवींनी **ख्रिस्ताश्रम** या नावाचे एक 'कवितेचे मासिक पत्र' जानेवारी १९०४ पासून सुरू केले होते. हे केडगाव (जिल्हा पुणे) येथील मुक्ति-मिशनात प्रसिद्ध होई. कवितेच्या द्वारे ख्रिस्ती समाजाची सेवा करण्यासाठी हे पत्रक दरमहा काढण्याची योजना केली आहे, असे याच्या संपादकांनी जाहीर केले होते. याच्या आक्टोबर १९०४ च्या दहाव्या अंकात आठ रत्ने, लोभाविषयी जपा, लाजारस, व ख्रिस्तस्तवन या विषयांवर कविता आल्या होत्या यावरून याचे स्वरूप लक्षात येते. वार्षिक वर्गणी टपाल हंशीलासह फक्त तीन आणे होती. हे बहुधा वर्षभर चालले असावे, कारण नंतर याचे नाव ऐकू येईनासे झाले.

नंतर मार्च १९०४ मध्ये **मधमाशी** या सार्थ नावाचे मासिक पंडिता रमाबाई यांनी सुरू केले. हे मुक्ति मिशन छापखाना, केडगाव येथे छापून तेथेच प्रसिद्ध करण्यात येई. याच्याबद्दल ज्ञानोदयकार आपल्या २७-१०-१९०४ च्या अंकात म्हणतात, "बालबोध व सुलभ गोष्टी, दाखले व स्पष्टीकरण यांकडून शास्त्रवाचन शिकविण्याचा या पुस्तकाचा बाणा दिसतो. अज्ञान मुलांपासून सुशिक्षित थोरापर्यंत या मासिकापासून आत्मिक अन्न मिळावें अशी योजना आहे. या पुस्तकात तत्वज्ञानाने भरलेले विषय नाहीत, कठीण व गहन विषयांची फोड दिसून येत नाही. जाड्या संस्कृत शब्दांनीं भाषेचें थोरपण दाखविलेलें नाहीं. ख्रिस्ती लोकांनीं ही मधमाशी आपल्या घरात ठेवावी व हिच्या मधाने आपली व आपल्या लेकरांची जीभ गोड करावी." याची वार्षिक वर्गणी टपाल हंशीलासह एक रुपया. असे सर्वसाधारणपणे ख्रिस्ती धर्मातील गोष्टी, ख्रिस्ताची मनोरम वचने, बालबोध भाषेत कविता आणि सृष्ट पदार्थांची माहिती यात दिलेली असे· याचे ब्रीदवाक्य "मनोरम वचनें मधाचा शिसा अशी आहेत. ती जिबाला

गोड व हाडांस आरोग्य आहेत." आणि "परमेश्वराचे न्याय सत्य आहेत. मधंपेक्षा, मोहळाच्या पाझरापेक्षाही ते गोड आहेत.' असे होते. नारायण वामन टिळक व मनोहर विठ्ठल तर्खडकर यांच्याही कविता या मासिकात येत. यात एका ठिकाणी म्हटले आहे, "हल्लीं आपल्या महाराष्ट्र देशात मुलांसाठी म्हणून प्रसिद्ध होणारी एक दोन मासिक पुस्तकें आहेत, त्यांसारखे आणखी हे ... महिन्यातून एकदा तरी प्रसिद्ध होईल. साधल्यास दोनदा ..." परंतु रमाबाईंच्या मागे इतर अनेक कामांचा व्याप फार असल्याने बरोबर एक वर्षाचे बारा अंक काढून त्यांनी फेब्रुवारी १९०५ नंतर ते बंद केले.

या पुढले मराठी ख्रिस्ती मासिक म्हणजे ख्रिस्ती नागरिक. जानेवारी १९०४ मध्ये याचा एक नमुना अंक प्रसिद्ध करण्यात आला होता. परंतु खास मासिक म्हणून याचा पहिला अंक १५ डिसेंबर १९०४ रोजी बाहेर पडला. कोणत्याही मिशनच्या अगर मिशनरीच्या आश्रयाशिवाय स्वतंत्रपणें एखादे नियतकालिक काढण्याचा हा आणखी एक प्रयत्न भास्कर नानजी कोतक यांनी केला होता. अशा प्रकारचे प्रयत्न निष्फळ ठरले आहेत, असे डॉ. जे. ई. ॲबट यांनी या मासिकाबद्दल लिहिताना ज्ञानोदयात म्हटले आहे. या मासिकाचे संपादक म्हणून ना. वा. टिळक यांची योजना करण्यात आली होती. तसेच भा. ना. कोतक हे याचे व्यवस्थापक आणि बा. ना. आठवले याचे खजिनदार होते. याच्या जाहिरातीत म्हटले आहे, 'हे दर महिन्याच्या १५ व्या तारखेस निघेल. तसेच त्याची सर्व प्रकारची मालकी व अर्थात जबाबदारी पण, खाली सही करणाराकडे आहे. तरी ह्याचे संपादकत्व रेव्ह. नारायणराव वा. टिळक, ख्रिस्तसदन, राहुरी, जि. अहमदनगर, यांच्याकडे आहे. पत्राची वर्गणी ट. हा. सुद्धा किंवा शिवाय रु. १-३-० ठेविली आहे भास्कर नानजी कोतक, ७६ रास्त्याची पेठ, पुणे शहर." यात धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक विषयांवर लेख वादविवाद, गोष्टी, चरित्रे व कविता येत. २४ एप्रिल १९०५ रोजी इंडियन ख्रिश्चन असोसिएशनने मुंबईत प्रथमच भरविलेल्या ख्रिस्ती समाजाच्या जाहीर मेळाव्यावर या मासिकात टीका आली होती. पुढे

ऑगस्ट १९०५ मध्ये टिळकांनी याचे संपादन सोडून दिले. याबाबत केलेल्या जाहीर निवेदनात ते म्हणतात, " ख्रिस्ती नागरिक पत्राशी आता आमचा कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं ... जर तें पत्र इंग्रजींतच चालूं लागलें व त्यानें The Christian Citizen ( द ख्रिश्चन सिटिझन ) इतकेंच आपलें नांव कायम ठेवून 'ख्रिस्ती नागरिक' या नांवाचा त्याग केला तर आम्ही त्या नांवाचें एक पत्र काढण्याचा विचार करूं व तें पत्र येथून तेथून मराठीत निघेल " (ज्ञानोदय २४–८–१९०५) या मासिकाचा एक इंग्रजी विभाग असे व त्याचे संपादक गणपतराव नवलकर असत. याच्या सप्टेंबर १९०५ च्या अंकात "ही कविता कि कपिता" या शीर्षकाखाली एका तरुण कवीच्या काव्यावर टीका आली होती "हें पत्र स्वतंत्रतेच्या बाण्यावर चालत आहे आणि त्याची भाषा शुद्ध व साधी आहे." असे तुकाराम नथोजी यांनी म्हटले आहे. ( ज्ञानोदय ४–१–१९०६ ) पुढे कोतक कलकत्त्याला गेले तेथून त्यांनी आक्टोबर १९०७ चा अंक काढला होता. बरीचशी झीज सोसून त्यांनी हे मासिक तीन वर्षे चालविले. शेवटी नोव्हेंबर १९०७ पासून त्यांना हे ओजस्वी व बाणेदार मासिक नाईलाजाने बंद करावे लागले.

पुढे सेंट जॉन मिशन, पंच हौद, पुणे याचे मुखपत्र म्हणून पवित्र नाम या नावाचे मासिक डिसेंबर १९०६ पासून निघू लागले. याचे संपादक रुबेन ढवळे हे होते. हे दर महिन्याच्या पहिल्या तारखेस प्रसिद्ध होई. याची वार्षिक वर्गणी बारा आणे असून अंकाची किंमत अर्धा आणा असे. हे इस्त्रलाईट प्रेस, पुणे येथे छापत सुरवातीला याची चारपाच पाने असत पण फेब्रुवारी १९०७ पासून आठ पाने करण्यात आली व ते कोल्हापूरच्या मिशन छापखान्यात छापले जाऊ लागले. पुढे ऑगस्ट १९०७ पासून याची वार्षिक वर्गणी नऊ आणे करण्यात आली. यात ख्रिस्ती मासिक पंचांग, धर्मक्षेत्रीय बातम्या, सामाजिक घडामोडी, स. ब. लोटलीकर, जे. हेनरी लॉर्ड, भाऊराव चक्रनारायण वगैरे व्यासंगी लेखकांचे लेख, शं. ब. कुलकर्णी, मनोहर तर्खडकर यांच्या कविता वगरे येत. यातही सप्टेंबर

१९०५ पासून इंग्रजी विभाग सुरू करण्यात आला होता. पुढें १९१३ साली रुबेन ढवळे यांची मुंबईला बदली झाली तेव्हा ते बंद पडले.

याशिवाय बंधुप्रीती या नावाचे एक मासिक जालन्याजवळील बेथेल येथे काढण्यात आले होते. हे १८९४ ते १९०८ या काळात केव्हातरी सुरू झाले होते, असे अनुमान काढता येते. जालना प्रान्त व बेथेल प्रान्त यांतील स्कॉटिश चर्चच्या दोन मंडळयांचे हे मुखपत्र असून ते आर. वी. डग्लस हे काढीत असत. यात वरील मंडळयांच्या कामाच्या तारखा, बाप्तिस्मे, लेख, कविता वगैरे छापीत असत. हे मासिक सुमारे आठ दहा वर्षे चालले होते. ही माहिती "जालना प्रांतातील ख्रिस्तकार्याचा शतवार्षिक संक्षिप्त अहवाल १८५५ – १९५५" या पुस्तिकेवरून घेतली आहे. याची इतर काहीच माहिती मिळत नाही.

सच्छास्त्रप्रदीपक या नावाचे एक स्वतंत्र मासिक बेळगाव येथून विलयम सी. अर्विन यांनी १९०८ पासून काढण्यास आरंभ केला. दि. ९-५-१९०८ च्या जाहीर निवेदनात ते म्हणतात, "आम्ही सच्छास्त्रप्रदीपक नावाचे हस्तपत्रक प्रसिद्ध करण्याचे योजिले आहे. ते महिन्याला एकदा निघेल. या पत्रकाचे मुख्य उद्देश, शास्त्रस्पष्टीकरण, त्याचा क्रमवार अभ्यास व ख्रिस्ती धर्माच्या मुख्य सिद्धांतांचे विवेचन असे विविध आहेत. हे पत्रक एतद्देशीय ख्रिस्ती लोकांस व मिशन कामगारांस त्यांच्या शास्त्राध्ययनात उपयोगी पडून त्यांच्यांत शास्त्राविषयी विशेष प्रीती व आदर उत्पन्न करण्यात व त्यांची त्यांच्या अति पवित्र धर्मात स्थापना करण्यात साह्यकारक होईल अशी उमेद बाळगितो. हे ज्यांस पाहिजे असेल त्यांनी खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा म्हणजे त्यांस फुकट पाठवून देण्यात येईल. जर कोणाला आपल्या मित्रमंडळीत व ओळखीच्यांत नेमाने वाटायचे मनात असेल तर त्यांनी आपणाला किती प्रती लागतील हे कळवावे. किंमत किंवा टपालखर्च पडणार नाही. पहिला अंक जून महिन्यात निघेल. मि. डब्लयू. सी. अर्विन, मुलांची अनाथ शाळा, बेळगाव" (ज्ञानोदय २८–५–१९०८)

याप्रमाणे सच्छास्त्रप्रदीपकचा पहिला अंक जून १९०८ मध्ये बाहेर ड ला. तेव्हापासून तर थेट १९३७ पर्यंत अर्विन यांनी हे मासिक चालविले.

अविन रजेवर जात तेव्हा आर्थर ई. स्टॉरी यांचे संपादक असत. डिसेंबर १९३२ पासून स्टॉरी यांचे नाव संपादक व प्रकाशक म्हणून दिसून येते. या काळातच शंकरराव कुलकर्णी हे सहसंपादक होते. अंकाच्या सुरवातीला त्यांची एक आर्या अशी असे,

विनत विनंती परिसा, सच्छास्त्रप्रदीपकास भेटा या ।
पत्ता – सहसंपादक, हिंडलगी, बेळगाव जिल्हा हा ।।

याच्या लेखकवर्गात सुमित्रराव मोडक, म. बा. आढाव वगैरे होते. सुमारे तीस वर्षे हे मासिक चालविल्यानंतर अविन यांना उतारवयामुळे त्याचे काम झेपेनासे झाले म्हणून त्यांनी आर. सी. ई. अॅटकिन्सन यांना संपादक होण्याची विनंती केली, पण ती अमान्य झाल्यामुळे त्यांना १९३७ त हे मासिक बंद करावे लागले.

पुढे ऑक्टोबर १९४९ मध्ये अॅटकिन्सन यांनीच सच्छास्त्रप्रदीपक पुन्हा सुरू केला आणि सतत १४ वर्षे चालवून व ऑक्टोबर १९६३ त शेवटला अंक काढून तो बंद केला. या काळात त्यात मुलांचा विभाग सुरू करण्यात आला होता. बायबल मधील दोन अध्यायांचा अभ्यास करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे मागविण्यात येत. नंतर त्यांवर गुण देऊन १०० पेक्षा अधिक गुण मिळविणारांस बक्षिसे देण्यात येत. अविन यांच्या काळात हे मासिक विनामूल्य मिळे. अॅटकिन्सन यांनी मात्र एक रुपया वार्षिक वर्गणी ठेवली होती. परंतु एक रुपया देणे जड गेल्यास केवळ कार्ड पाठवून वर्षभर अंक फुकट मिळे.

कोणत्याही संस्थेचे वा मिशनचे पाठबळ नसतांना ४४ वर्षे केवळ धार्मिक स्वरूपाचे मासिक चालविणे ही खरोखरच कौतुकास्पद गोष्ट होय. ऑक्टोबर १९६३ च्या शेवटल्या अंकात संपादक म्हणतात, " तथापि पैसे कमी पडल्यामुळे हे काम मी बंद करीत नाही, हे आपण खरे मानावे. बंद करण्याचे मुख्य कारण हेच की प्रभूच्या सेवेसाठी मला अधिक वेळ पाहिजे आहे. ... ...कोणाला धाडस व प्रेरणा असेल तर प्रदीपकासारखे मासिक सुरू करावयास मोकळीक आहे. माझा सल्ला आहे की, नवीन मासिक सुरू केले तर त्याला नवीन सुरस नाव द्यावे.

सच्छास्त्रप्रदीपक हे नाव लिहावयास व उच्चारावयाससुद्धा कठीण आहे. ... ... प्रदीपक बंद झाल्यामुळे मी कोणाचे आर्थिक नुकसान होऊ देणार नाही. ज्यांची वर्गणीची शिल्लक एक रुपयापेक्षा कमी आहे, त्यांची मी २ ते १० महिन्यांची ' रोजची भाकर ' ची वर्गणी भरीन. ज्यांची शिल्लक एक रुपयापेक्षा जास्त आहे त्यांना मी कार्ड लिहून विचारीन—

(१) मी ही रक्कम तुमच्या ' रोजची भाकरी 'ज्या वर्गणीसाठी देऊ काय ? तुम्ही त्या द्वैमासिकाची १९६४ ची वर्गणी भरली तरी हरकत नाही; मी १९६५ ची किंवा त्यापुढचीही वर्गणी तुमच्या पैशाने भरीन.

(२) तुमची शिल्लक मी मनिऑर्डर करून तुम्हांकडे पाठवू काय ? '
या शिवाय ज्या मुलांनी गुण मिळविले होते त्यांना ३॥ पैसे दराने पैसे पाठविण्याचेही त्यांनी जाहीर केले होते. वर्षाची पुरी वर्गणी वसूल करून वाचकांची एक दोन अंकावरच बोळवण करून फरारी होणाऱ्या संपादकांनी ही गोष्ट विशेष लक्षात घेण्याजोगी आहे.

नंतर जानेवारी १९१० पासून डेविड लुकास जोशी यांनी धर्मदीपिका हे नवे मासिक सुरू केले. याची वार्षिक वर्गणी रु. १-२-० असे व हे मुक्ति मिशन प्रेस, केडगाव येथे एक वर्षभर मोफत छापून द्यायचे पंडिता रमाबाईंनी आश्वासन दिले होते. १९०९ मध्येच रेव्ह डब्ल्यू वायट, सी. एम्. एस्. चे मिशनरी, यांनी एक इंग्रजी-मराठी नियतकालिक काढावे असे सुचविले होते व त्यानंतर जे. एच. रॉबर्टसन, दयाराम शिंदे व जोशी यांची समिती नेमण्यात आली होती. तिच्या विचारविनिमयातून धर्मदीपिकेचा जन्म झाला. या मासिकाच्या दर अंकात २४ पाने व क्वचित प्रसंगी अधिक पाने असत. त्यात धर्मपर व आंग्ल संप्रदायी मंडळयांतील घडामोडी, स्फुट विचार, धर्मपर लेख, ख्रिस्त पुराणातील वेचे व मनोहर तर्खडकर व बाजी ल. साळवी, शंकरराव कुलकर्णी या कवींच्या कविता असत. याचे ब्रीदवाक्य असे —

' मनी ख्रिस्त माझा ! जनी ख्रिस्त माझा
वनी ख्रिस्त माझा ! गुरु, बंधु, राजा

तुझी हिंदभूमी प्रभो ! ख्रिस्त राया
तुझी ! ही तुझी ! माझि हे भ्रांति वाया

पुढे १९१३ मध्ये दिनकर अप्पाजी यांनी हे जोशींचे सह-संपादक झाले. १९१६ पर्यंत व्यवस्थित चालून मार्च १९१६ पासून हे संपूर्णतया इंग्रजीत निघू लागले व याचे नाव 'इंडियन ख्रिश्चन रिव्हयू' असे ठेवण्यात आले.

त्यानंतर जानेवारीं १९१२ पासून 'शब्बाथशाळापत्रिका' हे नियत-कालिक 'बॉम्बे ट्रॅक्ट ॲन्ड बुक सोसायटीचे मॅनेजिंग एडिटर' यांनीं चालू केले. याचे १८ फेब्रुवारी, १९१२ पर्यंतचे सात अंक मिळाल्याची पोच दि. ११-१-१९१२ च्या ज्ञानोदयात दिली आहे. "एकंदरीत हे पुस्तक आकाराने व मजकुराने फार चांगले साधले आहे" असे ज्ञानोदयकार म्हणतात. मुंबईतील नामांकित ख्रिस्ती संगीतज्ञ विनायकराव काशीनाथ कोशे यांना इंडियन संडे स्कूल युनियनने १९१३ त मराठी चिटणीस नेमले होते. तेव्हा मे १९१४ पर्यन्त त्यांनी हे नियतकालिक चालविले असा उल्लेख सापडतो. त्यानंतर मात्र याचे नाव गाव ऐकू येत नाही.

याच सुमारास म्हणजे १९१२ च्या आसपास यंग वुइमेन्स ख्रिश्चन असोसिएशनने 'प्रेमदर्शिका' या नावाचे एक त्रैमासिक सुरू केल्याचा उल्लेख आढळतो. हे लवकरच बंद पडले. पुढे "त्रैमासिक पत्रिका" या नवीन नावाने व नव्या स्वरूपात ते मार्च १९१६ त पुन्हा सुरू झाले. "हे हिंदी स्त्रियांकरिता व मुलींकरिता आहे. यात वर्षारंभीचा संदेश, तरुण ख्रिस्ती स्त्रियांचे चतुर्वार्षिक संमेलन, मराठी शाखेची वार्षिक सभा, निवांत वेळेकरिता दोन विचार, शास्त्रात वर्णिलेल्या एका स्त्रीच्या चरित्रावरून विचार(रूथ), हिंगणे अनाथ बालिकाश्रमाची माहिती, उपयुक्त शिक्षण, स्त्री सौन्दर्याचे अध्ययन, वगैरे उपयुक्त विषय आहेत." असे ज्ञानोदयाच्या ३०-३-१९१६ च्या अंकात म्हटले आहे. याची वार्षिक वर्गणी पाच आणे होती. फुटकळ अंकास सव्वा आणा पडे. मिसेस आर. एस. रोज, वाय. डब्ल्यु. सी. ए. मुंबई याच्या संपादिका होत्या. ख्रिस्ती स्त्रियांकरिता

एकही मराठी पत्र नाही म्हणून ही उणीव भरून काढली असे याविषयी म्हटले आहे. हे त्रैमासिक १९२३ पर्यन्त चालले व नंतर ते बंद पडले.

"ख्रिस्ती लोकांच्या निरनिराळ्या मतांस जागा मिळून लेखकवर्गास उत्तेजन प्राप्त व्हावे" या उद्देशाने हिरालाल जीवनलाल (जीवनराव) राहाटोर यांनी जानेवारी १९१३ पासून **समाजादर्श** हे मासिक काढले. याच्या जाहिरातीत म्हटले आहे, "या मासिक पुस्तकात सामाजिक, नैतिक, व्यवहारिक आणि धार्मिक विषय असून शिवाय सुरस गोष्टी अथवा चालू कादंबरी प्रसिद्ध होईल." (ज्ञानोदय-नोव्हें.-डिसेंबर १९१३) याची वार्षिक वर्गणी रु. १-३-० असून ते वडाळे, जिल्हा अहमदनगर येथून प्रसिद्ध होई संपादकांचे सहाय्यक भाऊराव भागोबा चक्रनारायण शिवाय प्रभाकर प्रतापराव गोर्डे, वेंगुर्ले यांचीही मदत असे; पण पुढे ३-४ महिन्यातच त्यांनी या मासिकाशी असलेले संबंध तोडले. याच्या दहाव्या अंकात, राजापूरकर यांनी लिहिलेले बाबा पदमनजींचे चरित्र, "दीनमित्र "च्या संपादकांचा लेख वगैरे पाच लेख आले होते. याचे डिसेंबर १९१३ पर्यंत बरोबर बाराच अंक निघाल्यानंतर ते बंद पडले.

पुढे २७-३-१९१३ च्या ज्ञानोदयात एक जाहिरात प्रसिद्ध झाली होती. त्यात द नॅशनल मिशनरी सोसायटीचे मराठी त्रैमासिक पुस्तक एप्रिल महिन्याच्या २० तारखेच्या आतबाहेर प्रसिद्ध होईल आणि वाचकांना हे पुस्तक फुकट देण्यात येईल; वर्गणी टपालखर्च काही नाही, असे जाहीर करण्यात आले होते. याचे "संपादक, व्यवस्थापक, मालक" शांतवनराव आठवले बी. ए. बॅरिस्टर ॲट लॉ, पिकेट चेंबर्स, मुंबई नं. २ हे होते. या त्रैमासिकाचे नाव **धर्मप्रचारक** असून "आपण आपली मने आपल्या राष्ट्राइतकी किंबहुना त्याहून अधिक विस्तृत करण्याचे प्रयत्नास लागले पाहिजे," असा याचा हेतू असल्याचे पहिल्या अंकात म्हटले होते. हा पहिला अंक सप्टेंबर १९१३ अगर तत्पूर्वी केव्हा तरी निघाला होता असे दिसते; पण यानंतर ते किती काळ चालले वगैरे तपशील मिळत नाही.

१९१६ मध्ये **सुवृत्तप्रसार** या नावाने मासिक निघू लागले. याच्या प्रकाशिका मिस एल. बो. फुलर, अकोला या होत्या. हे मासिक सुमारे

वर्षभर चालून नंतर बंद पडले. याविषयी अधिक माहिती उपलब्ध झाली नाही.

त्यानंतर १९१९ साली मुक्तिफौज किंवा साल्व्हेशन आर्मीचे **तरुण शिपाई** हे मासिक सुरू झाले. त्यावेळी त्याचे संपादक कर्नल मथाया हे होते. पुढे १९२७ मध्ये लेफ्ट. कर्नल दयासागर ( बरफूट ) हे त्याचे संपादक झाले. हे धार्मिक स्वरूपाचे असून विशेषत: मुक्तिफौजेतील तरुण मंडळीकरिता असे. पुढे जानेवारी १९५० पासून हे नवीन स्वरुपात निघू लागले. सध्या हे पश्चिम भारत टेरिटरी मुक्तिफौजेच्या बाल–सैनिकांकरिता अधिकृत मराठी मासिक आहे. यात कोअर कॅडेटचे धडे, मततत्व अभ्यास मार्गदर्शिका, पलटणींच्या हालचाली वगैरे मुक्तिफौजविषयक मजकूर असतो. याची वार्षिक वर्गणी दिलेली नाही. किरकोळ अंकाची किंमत सहा पैसे आहे व हे मुंबईहून प्रसिद्ध होत असते.

मेथडिस्ट एपिस्कोपल मिशनचे मुखपत्र म्हणून सुदामराव विश्रामजी हिवाळे यांनी **मेथॉडिस्ट संदेश** या नावाचे मासिक सुरू केले होते. याविषयी लिहिताना भास्कर कृष्ण उजगरे आपल्या मराठी ख्रिस्ती वाङ्मयविषयक निबंधात म्हणतात, ' हे मासिक पत्र मेथॉडिस्ट मिशनचे रेव्ह. एफ. वुड व रेव्ह. एस. हिवाळे यांनी इ. स. १९२४ त मुंबई येथे काढिले. याचा उद्देश राजकीय, सामाजिक व धार्मिक होता. " परंतु खुद्द रेव्ह. हिवाळे " माझी अल्पशी प्रभुसेवा " या त्यांच्या आत्मचरित्रात म्हणतात. ' इ. स. १९२१ मध्ये मेथॉडिस्ट संदेश हे मासिक माझ्या संपादनाखाली निघू लागले. हे मासिक सुमारे दोन वर्षे चालले. नंतर लोकांचे सहकार्य न मिळाल्यामुळे हें मासिक बंद पडले. " या मासिकाविषयी अधिक माहिती मिळाली नाही.

पुढे ऑल सेंटस् होम, माजगाव, मुंबई या संस्थेतर्फे **मातृसंघ** या नावाचे एक त्रैमासिक १९२२ त सुरू झाले. याच्या पहिल्या संपादिका मिसेस हीटन या होत्या. याचा हेतू विवाहाचे पावित्र्य कायम राखून आपली मुले साम्राज्याचे आधारस्तंभ होणार एतदर्थ त्यांस योग्य शिक्षण देण्याची जबाबदारी मातांवर आहे, याची जाणीव उत्पन्न करून देणें, हा

होता. याच्या संपादिकांत मिस ए. येटस्, सौ. सोनुबाई आढाव, सौ. मुक्ता बाई ओहोळ, सौ. प्रेमलाबाई डेविड, सौ. सुलोचनाबाई तिडके, सौ. पद्मा बाई पगार, सौ. जेसिकाबाई साळवी अशी नावे वेळोवेळी आढळतात. मुंबई, नाशिक व नागपूर या आंग्लसंप्रदायी धर्मप्रांतातील मातृसंघाच्या शाखेचे कार्य व अहवाल, गोष्टी, स्त्रियांसाठी लेख, कविता, सुगरिणीचे पान वगैरे उपयुक्त विषय असत. १९६५ पासून मात्र हे फक्त नाशिक धर्मप्रांता-तर्फे निघू लागले. यावेळी एप्रिल, ऑगस्ट व डिसेंबर असे दरवर्षी तीनच अंक निघत होते व ते नाशिकच्या नागरिक मुद्रणालयात छापले जाई. प्रत्येक अंकाची किंमत १५ पैसे असे वार्षिक वर्गणी नसे. हे नियतकालिक १९६८ च्या सुमारास बंद पडले असे कळते.

पुढे मे १९२३ पासून भारत ख्रिस्ती सेवक या नावाचे एक त्रैमासिक नॅशनल मिशनरी सोसायटीचे मुखपत्र म्हणून सुरू झाल्याचे दिसून येते. याचे संपादक शांतवन लक्ष्मण साळवी, अमेरिकन मिशन, अहमदनगर आणि व्यवस्थापक दिनकर राघोबा आठवले, एस. पी. जी मिशन अहमदनगर हे होते. " आपल्या समाजाचे वैशिष्टच त्याचे अंतिम ध्येय व झपाट्याने वाढत असलेल्या त्याच्या कार्याचे स्वरूप याविषयी भरपूर माहिती देण्यात येणार. " अशी जाहिरात त्यावेळी ज्ञानोदयात प्रसिद्ध झाली होती याची वार्षिक वर्गणी आठ आणे होती. आश्रय मिळाल्यास पुढील वर्षापासून मासिक काढण्याचा संपादकाचा मनोदय होता. तसेच पत्ता कळविल्यास पहिला अंक मोफत पाठविण्याचेही अभिवचन देण्यात आले होते. पुढे १८–५–१९२३ च्या ज्ञानोदयात याच्या पहिल्या अंकाची पोच देण्यात आली होती. यात पुरुष, स्त्रिया व विद्यार्थी यांना मनोरंजनार्थ कूट प्रश्न विचारण्यात आले होते व बिनचूक उत्तरांना बक्षिसे देण्यात येणार असे जाहीर केले होते हे त्रैमासिक फक्त एक वर्ष चालून नंतर बंद पडले.

याशिवाय जुलै १९२३ पासून ख्रिस्ती या नावाचे एक मासिक निघाले होते. याचे प्रकाशक रेव्ह, जे. स्मिथ सेक्रेटरी बाँबे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी हे होते. हे मुंबईतल्या लक्ष्मी नारायण छापखान्यात छापले जाई. या मासिकाची यापेक्षा जास्त माहिती उपलब्ध नाही.

अहमदनगर येथे १९२३ त एक शैक्षणिक परिषद भरविण्यात आली होती. या परिषदेत खास शिक्षकांना नवीन शिक्षण तंत्राची माहिती करून देऊन अन्य उपयुक्त माहिती देण्याकरिता 'नवा शिक्षक' या नावाचे नियतकालिक काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या काळात पंजाबातील मोगा येथे डॉ. डब्ल्लू. जे. मॅकी हे व्हिलेज टीचर्स जर्नल हे इंग्रजी नियतकालिक चालवीत होते. त्यातले लेख भाषांतरित करून 'नवा शिक्षक' मध्ये प्रसिद्ध करण्याची प्रथम योजना होती; पण कालांतराने महाराष्ट्राची गरज भागविण्यास हे केवळ भाषांतरित लेख पुरेसे नाहीत असे दिसून आल्याने यातून नवीन स्वतंत्र पुस्तकेच प्रसिद्ध करण्याची योजना आखण्यात आली.

त्याप्रमाणे या नियतकालिकातून खेडेगावच्या शाळा, मिशन शाळांतील धार्मिक शिक्षण, खेडेगावांकरिता छोटी प्रहसने, कथा–कथन ग्राम-पुनर्रचना वगैरे विविध विषयांवर पुस्तिका तयार करण्यात आल्या. नवा शिक्षकचे पहिले संपादक विल्बर स्टोन डेमिंग आणि सहाय्यक मिस जेन लॅथॅम व शा. ल. साळवी हे होते.

या मासिकाचा पहिला अंक जुलै १९२४ त बाहेर पडला. याची वार्षिक वर्गणी रु. १–८–० व फुटकळ अंकास तीन आणे असे. भाषांतराची जबाबदारी दिनकर शंकर सावरकर व नंतर मिस अॅना अॅग्नेस अॅबट यांच्यावर सोपविण्यात आली होती. भाषांतरकार हिरालाल राहाटोर व आर. ए. जोशी हे असत. १९३१—३२ साली याचे संपादक रेव्ह व मिसेस एफ. ए. पफर हे होते. पुढे रेव्ह होरेस के व मिसेस राईट हे संपादक झाले. या मासिकाचे १९४० पर्यंतचे अंक माझ्या पाहाण्यात आले. नंतर ते बंद पडले असे दिसते.

त्यानंतर भास्करराव भाऊराव चक्रनारायण यांनी १९२५ पासून मेसेज हे इंग्रजी व मराठी पाक्षिक पुण्यात सुरू केले. राजकीय, सामाजिक व धार्मिक विषयांना वाहिलेले हे पाक्षिक दिनांक ५ व २० रोजी दरमहा प्रसिद्ध होई. यात शाहू दगडोबा उजगरे यांचे लेख व कविता, रामचंद्र प्रल्हाद देशपांडे, जॉन वासुदेव धूपकर वगैरेंचे लेख असत. 'जगण्याचे

सार्थक ' या कादंबरीची प्रकरणेही येत असत. लेखकाचे नाव दिलेले नाही. मला उपलब्ध झालेल्या दोन अंकांवर वार्षिक वर्गणी किंवा किरकोळ अंकाची किंमत दिलेली नाही. हे सुमारे चार वर्षे चालून नंतर बंद पडले असावे असे दिसते.

मुक्तिफौजेच्या अंमलदारांकरिता एक खास मासिक मुंबईत आक्टोबर १९२५ पासून **अंमलदार** या नावाने प्रसिद्ध होऊ लागले. याचे सुरवातीचे संपादक ले. कर्नल दयासागर (बरफूट) हे होते. चालू अंकावर याचे वर्ष ५१ वे दिले आहे (१९७३). यावरून पाहता हे जानेवारी १९२३ त सुरू झाले असावे असे वाटते. पण कदाचित मध्यंतरी ' वर्षांची ' गफलत झाली असावी असे दिसते. १९२५ ते १९३८ पर्यंत हे मासिक म्हणून निघत होते. पुढे १९३९ पासून तर आजपर्यंत ते त्रैमासिक म्हणून निघत आहे.

मुक्तिफौजेच्या अधिकारीवर्गाकरता हे प्रसिद्ध होत असल्याने ते केवळ त्यांच्याकरिताच असलेले खाजगी प्रकाशन आहे. अंमलदारांकरिता उपयुक्त लेख, मुक्तिफौजेचे तत्त्वविषयक लेख, ग्रंथ परिचय व इतर घडामोडी असे याचे सर्वसामान्य स्वरूप आहे. याला वार्षिक वर्गणी वगैरे काही नाही. याच नावाचे एक त्रैमासिक मुक्तिफौजेतर्फे १८८२ साली काढण्यात आले होते असे १९५८ च्या रजिस्ट्रारच्या रिपोर्टावरून दिसून येते, पण त्याविषयी अधिक माहिती मिळत नाही.

ज्ञानोदयाची पुरवणी म्हणून निघत असलेला बाळबोधमेवा डिसेंबर १९१० नंतर बंद पडला, हे आपण पाहिलेच आहे. पुढे डॉ. मिस एमिली आर. बिसल, मुंबई यांनी जुलै १९२४ पासून तो पुन्हा चालू केला आणि डिसेंबर १९२५ अखेरपर्यंत तो ज्ञानोदयाची पुरवणी म्हणून निघत होता. त्यावेळी याची वार्षिक वर्गणी दोन रुपये होती. नंतर जानेवारी १९२६ पासून मात्र **बालबोध मेवा** स्वतंत्र मासिक म्हणून निघू लागले. याची वार्षिक वर्गणी ज्ञानोदयाच्या वाचकांना एक रुपया व इतरांना दोन रुपये ठेवण्यात आली होती. पहिल्या संपादिका मिस बिसल यांच्यानंतर देवदत्त नारायण टिळक याचे संपादक झाले. " आपल्या लेकरांस चांगल्या वाचनाची गोडी लावू इच्छिणाऱ्या आईबापांनी घ्यावे. " असे यात सांगितले

होते. यावेळी ते स्कॉटिश मिशन प्रेस, पुणे येथे छापीत. यात मुलांकरिता मनोरंजक व बोधपर गोष्टी, उपयुक्त माहिती, कविता, पशुपक्ष्यांची सचित्र माहिती वगैरे मजकूर येत असे. हे मासिक १९४२ पर्यंत म्हणजे एकंदर ५७ वर्षे चालून नंतर बंद करण्यात आले.

पुढे १९२५ च्या सुमारास श्रीमती लीलावतीबाई गायकवाड या रोमन कॅथलिक पंथीय भगिनीने **प्राग्ज्योति** या नावाचे नियतकालिक सुरू केले होते. कॅथलिक समाजात स्वतंत्र नियतकालिक काढण्याचा हा कदाचित पहिलाच प्रयत्न असावा. रेव्ह. भास्करराव उजगरे यांच्या वर उल्लेखिलेल्या निबंधात याचा समावेश आहे. याविषयी अधिक माहिती मिळाली नाही.

१९२६ पासून **हिंदी ख्रिस्ती पंचांग** या नावाचे स्वतंत्र मासिक लाजरस पाडळे यांनी चालू केले होते. याचे संपादक म्हणून दे. ना. टिळक यांची योजना करण्यात आली होती. पाडळे यांनी कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता आणि पदरचा पैसा खर्च करून व प्रसंगी उपासतापास काढून १९२६ ते १९२९ अखेरपर्यंत म्हणजे चार वर्षे हे नियतकालिक व्यवस्थित चालविले. पुढे द्रव्याच्या व वेळेच्या अभावी ते त्यांना बंद करावे लागले.

मिस फुलर यांनी **सुवृत्तप्रसार** या नावाचे मासिक अकोला येथे काढून सुमारे वर्षभर चालविले होते हे आपण पाहिलेच आहे. त्यानंतर सुमारे बारा तेरा वर्षांनी भुसावळ ख्रिस्ती समाचार या नावाचे एक मासिक पत्र निघू लागले यात स्थानिक बातम्या व हालचाली देण्यात येत असत. पुढे याचे स्वरूप थोडे व्यापक होऊन ते ' खानदेश ख्रिस्ती समाचार ' या नावाने निघू लागले याच्या सायक्लोस्टाईल प्रती काढण्यात येत असत. नंतर याच्या प्रकाशनाची जबाबदारी चर्च अँड मिशनरी अलायन्सने घ्यावी अशी सूचना पुढे आली. तेव्हा सुवृत्तप्रसार हे नाव घेतल्यास ते प्रसिद्ध करण्याची जबाबदारी घेण्याचे या मिशनने कबूल केले. त्याप्रमाणे जानेवारी १९२९ पासून किंवा त्या सुमारास **सुवृत्तप्रसार** हे मासिक सुरू झाले.

याचे पहिले संपादक एन. के. मेश्रामकर हे होते. सुमंत धों. रामटेके यांचेही साहाय्य काही दिवस मिळाले होते. गेल्या पंचेचाळीस वर्षात

ल. ना. चौधरी, फ्रेड डब्ल्यू. शिलॅन्ड, र. ना गव्हाणकर, वसंत भाऊराव समुद्रे, जयदेव तिमथी सिरवैया, एस टी गायकवाड, जे. आर. रायबोर्डे शरद बोर्डे वगैरेंनी या मासिकाचे संपादक व सहसंपादक म्हणून काम केले आहे.

यात लघुकथा, सामाजिक व धार्मिक लेख, संडे स्कूलचे पाठ, चरित्रे, सामाजिक हालचाली, कविता वगैरे विविध मजकूर येत असे. हे वऱ्हाड खानदेश चर्च कौन्सिलच्या क्षेत्रातील स्वीडीश अलायन्स, सी. अॅन्ड एम. अलायन्स, सी. आय. बॅप्टिस्ट, इव्हॅन्जेलिकल अलायन्स, चर्च ऑफ द नॅझरीन, फ्री मेथडिस्ट व नॉर्वेजियन फ्री इव्हॅन्जेलिकल मिशन या सात मिशनांचे मुखपत्र म्हणून नियत असे. परंतु वरील कौन्सिलच्या सप्टेंबर १९७३ मध्ये भरलेल्या बैठकीत हे मासिक बंद करण्याचा ठराव करण्यात आला. त्याप्रमाणे डिसेंबर १९७३ चा शेवटचा अंक काढून हे मासिक बंद करण्यात आले.

नंतर आंग्ल-संप्रदायी नाशिक धर्मप्रांताचे मुखपत्र म्हणून **नाशिक धर्मप्रांत** या नावाचे मासिक आक्टोबर १९३० पासून प्रसिद्ध होऊ लागले. हे नाशिक डायोसेसन कमिटीतर्फे दिनकर राघोबा आठवले यांच्या संपादकत्वाखाली भुसावळ येथे प्रसिद्ध होई. प्रत्येक अंकात १२ पृष्ठे असून वार्षिक वर्गणी रु. १-४-० असे. हे १९४२ पर्यंत चालू होते असे दिसून येते, पण केव्हा बंद पडले हे लगेच कळू शकले नाही.

पुढे १९३२ साली मुंबईहून **ख्रिस्ती लोकशिक्षणमाला** या नावाचे एक मासिक प्रसिद्ध होऊ लागले. याचे संपादक भास्कर पांडुरंग हिवाळे हे होते. या मालेत प्रत्येक अंकात एका विशिष्ट विषयांवर निबंध, काव्य, भाष्य वगैरे दिलेले असे. याप्रमाणे बायबलमधील ग्रंथांवर भाष्ये, त्यांचा इतिहास, यहूदी पंथ, "ख्रिस्त पुराणा"तील वेचे, काही उद्योगधंदे ( मधमाशा, कोंबडया, बकऱ्या पाळण्याचे ) इत्यादी विविध विषयांवरच्या आठ दहा पुस्तिका प्रसिद्ध झाल्या होत्या. प्रत्येक पुष्पाची किंवा अंकाची किंमत एक आणा असे. हे मासिक १९३२ पासून १९३७ पर्यंत चालले व नंतर बंद पडले.

यानंतर शोध आणि बोध या नावाचे आणखी एक मासिक वसईहून निघू लागले. याचा पहिला अंक जानेवारी १९३५ त प्रसिद्ध झाला. याचा एकही अंक मला मिळू शकला नाही; त्यामुळे याचे स्वरुप वगैरे संबंधी कोणतीच माहिती देता येत नाही. हे मासिक मुंबईतील एक्झॉमिनर प्रस येथे छापले जाई. हे कॅथलिक धर्मीयांसाठी असल्याचे म्हटले आहे. १९३७ पर्यंत हे मासिक होते. पुढे १९३८ पासून हे त्रैमासिक करण्यात आले होते.

यानंतर १५ सप्टेंबर १९३७ पासून ख्रिस्ती नागरिक या नावाने एक स्वतंत्र मासिक पुन्हा सुरु करण्यात आले. याचे संपादक देवदत्त नारायण टिळक हे होते. या अगोदर दोन वर्षे ते बालबोधमेवा या मासिकाबरोबर दर दोन महिन्यांनी एकदा पुरवणी म्हणून ते काढीत होते हे नासिक येथेच छापून प्रसिद्ध होई. पुढे १९३८ पासून ते टिळकांच्या नागरिक प्रेसमध्ये छापले जाऊ लागले. याची वार्षिक वर्गणी रु. ०-९-० असे. सुरवातीला हे मासिक संपूर्णतया मराठीत असे. पुढे मात्र काही मजकूर इंग्रजीत येऊ लागला होता. यात स्फुट विचार, सामाजिक घडामोडी व लेख, शास्त्र-पाठवाचन संघाकरिता पाठांचे स्पष्टीकरण, कविता वगैरे येत असत. याच ब्रीदवाक्य,

> "पाणी फोडुनिया तळचांत वरती डोकें जरी काढिलें
> पद्मानें तरि कृत्य तेंच अवघें त्याचें पुरें जाहले,
> त्याला गंध, विकास, सुंदरपणा ये, कृत्य हें भानुचें,
> सारें देव करील; हेतु धरणें हें मात्र हो आमुचे,'

असे होते. दुसऱ्या वर्षानंतर ना. वा. टिळकांचा ख्रिस्ती नागरिक हिशेबात धरून याचे सातवे वर्ष गणण्यात येऊ लागले. आक्टोबर १९४१ पासून नारायण देवदत्त टिळक याचे संपादक झाले. याचे डिसेंबर १९४२ पर्यंतचे काही अंक माझ्या संग्रही आहेत. कालांतराने हेही मासिक बंद पडले.

पुढे मुंबईचे अनंत विश्राम मकासरे यांनी ख्रिस्ती निरीक्षक हे स्वतंत्र मासिक सुरू केले. याची वार्षिक वर्गणी बारा आणे असून किरकोळ अंकास एक आणा पडे. याचा पहिला अंक मे १९३८ त बाहेर पडला. १९४०

पासून हे 'निरीक्षक' या नावाने प्रसिद्ध होऊ लागले. मे १९४१ पासून बी. ए. पाटेकर व १९४९ साली शा. द. उजगरे याचे सहसंपादक झाले होते. याची वार्षिक वर्गणी नंतर दोन रुपयापर्यंत वाढविण्यात आली होती. यात विविध विषयांवर सामाजिक, राजकीय व धार्मिक विषयांवर लेख, बातमीपत्रे, कविता व साहित्यविषयक मजकूर असे. हे स्वतंत्र बाण्याचे मासिक १९५० पर्यंत व्यवस्थित चालले होते. कालांतराने हेही बंद करण्यात आले.

१९३८ च्या सुमारास **आमचे पत्र** नावाचे आणखी एक नियतकालिक निपाणी येथे प्रसिद्ध होऊ लागले. दि. ११–८–१९३८ च्या 'ज्ञानोदया'त याचे चार अंक मिळाल्याची पोच दिली आहे. यावरून याचा पहिला अंक मे १९३८ त बाहेर पडला असावा असे अनुमान करता येते. जून १९३८ च्या 'खिरस्ती नागरिक' च्या अंकातही याचा उल्लेख आढळतो. याचे प्रकाशक एस. एन. काळे हे होते. खेडचापाडचातील खिरस्ती जनतेच्या आध्यात्मिक उन्नतीकरिता लेख, बातमी पत्रे वगैरे मजकूर यात असे. याची वार्षिक वर्गणी सहा आणे होती. यापेक्षा जास्त माहिती मला मिळू शकली नाही.

यानंतर ऑगस्ट १९३८ पासून **समाज–सेवक** हे नवीन स्वतंत्र मासिक पुणे येथे प्रसिद्ध होऊ लागले. याचे संपादक डॅनियल शांतवन सूर्यवंशी हे होते. हिंदी खिरस्ती समाजाच्या सर्वांगीण उन्नतीला हे वाहिलेले होते. इंग्रजी व मराठी अशा दोन भाषांत हे निघे. यातले संपादकीय इंग्रजींत व इतर बहुतेक मजकूर मराठी असे. सुरुवातीला याची वार्षिक वर्गणी आठ आणे व नंतर वाढत रु. २–८–० झाली. किरकोळ अंकास प्रथम एक पैसा पडे. 'जनसेवा ही ईश्वरसेवा' हे याचे ब्रीदवाक्य होते.

पुण्याच्या इंडियन खिश्चन असोसिएशनचे हे मुखपत्र होते. यात राजकीय, सामाजिक व धार्मिक लेख, घडामोडी, बातम्या व कविता आणि इतर मनोरंजक मजकूर असे. विशेषतः स्थानिक आय. सी. ए. चे व पूना नॅशनल चर्चचे कार्य व माहिती यांवर भर दिला जात असे. आणि भारतात एकच स्वतंत्र चर्च असावे याचा पुरस्कार करण्यात येई. ऑक्टोबर १९४८

पासून हे मासिक संपूर्णतया इंग्रजीत निघू लागले. कारण याचा प्रसार महाराष्ट्राबाहेर व परदेशातही होऊ लागला होता. नंतर मात्र हे अनियमितपणे निघू लागले आणि ऑगस्ट १९४९ नंतर बंद पडले.

जानेवारी १९३९ पासून कोल्हापूर येथे सुवार्ता या नावाचे मासिक प्रसिद्ध होऊ लागले. हे कोल्हापूर चर्च कौन्सिलचे मुखपत्र होते. याचे संपादक विश्वास आनंद सत्राळकर हे होते. याची पोच जानेवारी १९३९ च्या समाजसेवक या मासिकाच्या अंकात देण्यात आली आहे. या मासिका-विषयी अधिक माहिती मिळाली नाही.

पुढे ८ एप्रिल १९३९ रोजी दलित-दीपक या नावाचे एक स्वतंत्र मासिक उदयास आले. ख्रिस्त सेवा संघ, औंध, पुणे येथील म. का. गोरे हे याचे संपादक आणि केशवराव भारसकळ हे प्रकाशक होते. तसेच ख्रिस्त सेवा संघाचे आचार्य शंकरराव बी. वैरागर हे याचे संचालक होते. पहिल्या अंकातील ' आत्मनिवेदना ' त संपादक म्हणतात-" लोकसेवेच्या आकांक्षे-तून जन्मास आलेल्या ' दलित दीपक ' चा हा प्रथमांक प्रिय वाचकांच्या सेवेस सादर समर्पण करीत असता, नकळत मनात प्रस्थापित होत असलेल्या आनंदाची जाणीव हृदयास स्पष्टपणे होत असली, तरी शब्दांनी ती व्यक्त करणे कठीण आहे. आजतागायत अनेक समाजसेवक निरीक्षणपूर्वक समा-जाला खरे नागरिक बनण्याची शिकस्त करीत असता दीपकाच्या वाटचाला काही विशेष कार्यक्षेत्र येणार आहे असे नाही.

या दृष्टीने दीपकाला आपल्या स्वल्पाधिकाराची जाणीव सदैव राहील पण प्रिय वाचकांना जाता जाता असेही विचारण्याची धृष्टता करावीशी वाटते की, विशाल गगनी, साऱ्या भुवनाला उजळून काढणारा चंद्रमा, गुरु, मंगळादि तेजःपुंज खस्थ पदार्थ, तो पहाटेचा शुक्रतारा व आपल्या स्वरूपाने जगाला अजब मोहिनी घालणाऱ्या त्या तारका यांचे वैशिष्टय अनेक दृष्टींनी बहुमोल ठरत असले तरी जगाला आपला प्रकाश देण्याच्या पवित्र आकांक्षेने आपल्या मिणमिणत्या प्रकाशानेच जगाची सेवा करणाऱ्या एखाद्या दुर्बल तारकेचे महत्त्व कुण्या दृष्टीने कमी असू शकेल का ? निदान दीन दुबळ्यांच्या जीवनावर प्रकाश पाडण्याचे कार्य ' दलित दीपक ' नेटाने करील. ...

दीपक पेटविण्याचे काम आम्ही केले. आता तो तेवत ठेवून समाज-जीवनाच्या कोनाकोपऱ्यातून त्याचा प्रकाश पोचविण्याची पवित्र जबाबदारी आम्ही प्रिय वाचकांवरच टाकीत आहोत. . . . . वाचकांचे सहाय्य जमेस धरून 'दलित दीपक' सर्व दृष्टींनी आदर्श ठेवण्याची शक्यतो खबरदारी घेण्यात येईल. लघुकथा, सामाजिक, राजकीय व धार्मिक विषयांवरील दणदणीत व सशस्त्र लेख, विनोदी लेख इत्यादि साधनांनी दीपकाची घटना जरी व्यक्त होणार असली तरी सत्य व न्याय यांचे रक्षण करण्याची दीपक शक्य ती काळजी बाळगील. होतकरू लेखक, लेखिका, कविकवयित्री यांस विशेष उत्तेजन देण्यात येईल."

या मासिकाची वार्षिक वर्गणी बारा आणे होती व किरकोळ अंकाला एक आणा पडे. पहिल्या अंकात एक लघुकथा, धार्मिक लेख व कविता इत्यादी मजकूर आहे. हे स्वतंत्र व पुरोगामी विचाराचे मासिक फार दिवस टिकले नाही असे दिसते, कारण याची अधिक माहिती मिळाली नाही.

यानंतर आक्टोबर १९४१ पासून तरुणांचा ख्रिस्ती आवेश हे नवीन स्वतंत्र ख्रिस्ती मासिक मुंबईहून प्रसिद्ध होऊ लागले. याचे संपादक सत्यवान नामदेव सूर्यवंशी आणि प्रकाशक अनसूया नामदेव सूर्यवंशी होत्या. याचे ब्रीदवाक्य

जनसेवा प्रभुसेवा ध्येय असे आमुचे सदोदीत ।<br>
खंड न त्यात पडावा प्रार्थितसू ईश्वरास दिनरात ।।<br>
शक्त न आम्ही बल दे गौरविणे नाम ख्रिस्त परमेश ।<br>
सेवा करता करता टिकवू या हाच ख्रिस्ती आवेश ।।

असे होते. यात प्रामुख्याने ख्रिस्ती तरुणांकरिता मार्गदर्शनपर लेख येत असत. याची वार्षिक वर्गणी एक रुपया होती. १९४२ पासून हे मासिक 'तरुणांचा ख्रिस्ती आवेश आणि बालबोधमेवा' या नावाने प्रसिद्ध होऊ लागले, कारण ही दोन्ही मासिके एकत्र निघू लागली. हे मे १९४४ पासून बंद करण्यात आले. हा निर्णय एकाएकी घेण्यात आला आणि शिल्लक वर्गणी प्रत्येक वर्गणीदाराला परत करण्यात आली.

याप्रमाणे प्रकाशन स्थगित होऊन पुरी तीन वर्षे लोटल्यानंतर मे १९४७ त हेच मासिक 'आवेश' हे नाव घेऊन पुन्हा अवतीर्ण झाले. मागील प्रकाशन जमेस धरून मे १९४७ चा अंक वर्ष ३ रे अंक ८ वा असा गणण्यात आला. यावेळी मीरा सत्यवान सूर्यवंशी याच्या व्यवस्थापिका झाल्या होत्या. या मासिकाची वार्षिक वर्गणी तीन रुपये आठ आणे होती. पण डिसेंबर १९४७ पासून ती तीन रुपये करण्यात आली. या मासिकाला कोणत्याही संस्थेचा अगर व्यक्तीचा आर्थिक पाठिंबा नव्हता. खुद्द संपादकच गावोगावी कीर्तने करून द्रव्य जमवीत होते. जुलै १९४७ मध्ये आवेश साप्ताहिक करण्याची त्यांनी योजना आखली होती पण तिला मूर्त स्वरुप येऊ शकले नाही. या पुरोगामी विचारांच्या मासिकात ख्रिस्ती संस्था व व्यक्तींचे परिचय, कविता, लघुकथा, महिला व मुलांसाठी गोष्टी, सामाजिक प्रश्नांचा उहापोह, चुटके व अन्य विनोदी लिखाण वगैरे विविध मजकूर असे; त्यामुळे ते बरेच लोकप्रिय झाले होते. याचे १९४८ पर्यंतचे अंक पाहण्यात आले. नंतर केव्हातरी हे मासिक बंद पडले.

यापुढले स्वतंत्र मासिक हे अंकुश देखील मुंबईहून निघू लागले होते. याचे संपादक द. ह. चक्रे आणि प्रकाशक पी. डी. मर्चंट हे होते. या मासिकाचा पहिला अंक १८ जुलै १९४२ रोजी प्रसिद्ध झाला. यात सामाजिक धार्मिक तसेच राजकीय लेख, समाजातील घडामोडींवर विचार, लघुकथा व 'चौफेर नजर' हे सदर असा उपयुक्त मजकूर असे. याचे ब्रीदवाक्य येणे प्रमाणे –

कुणासाठी चाबूक पुरा होतो ।
पराणीने बैल हा मार्गि येतो ॥
परी हत्ती मस्तीस जेवि येई ।
तेवि अंकुश माहूत करी घेई ॥

याची वार्षिक वर्गणी एक रुपया असून किरकोळ अंकास एक आणा पडे. दुसऱ्या वर्षापासून अंकुश दरमहा वीस तारखेस निघू लागला. सुमारे १९४७–४८ पर्यंत चालून अंकुश काही 'गुंतागुंतीच्या घटनां'मुळे बंद करावा लागला. माहीतर 'अंकुश केव्हाच साप्ताहिक झाला असता' असे

संपादकांनी एके ठिकाणी नमूद केले आहे. पुढे नव्या दमाने अंकुश पुन्हा पाक्षिक म्हणून प्रसिद्ध होऊ लागला.

त्याचा पहिला अंक ( वर्ष ७ वे, अंक १ ला ) १५ सप्टेंबर १९५३ रोजी बाहेर पडला. याचे संपादक तेच व स्वरूपही पूर्वीचेच होते. वार्षिक वर्गणी मात्र तीन रुपये असून किरकोळ अंकास दोन आणे पडत. ऑक्टोबर १९५३ पासून आर. पी. लोंढे याचे व्यवस्थापक होते. हे पाक्षिक नंतर किती काळ चालले हे नक्की कळू शकले नाही.

नॉर्थ बेरार चर्च कौन्सिल या संस्थेचे एक मुखपत्र १९४४ किंवा त्या सुमारास निघू लागले होते या नियतकालिकाचे नाव **रणशिंग** असून ते बहुधा नेहेम्याच्या ग्रंथातील ४.१९-२० या वचनांवरून सुचले असावे असे दिसते, कारण ही वचने शीर्षकाखाली नमूद केलेली असत. फ्रेड डब्ल्यू शिलँडर यांनी हे मासिक सुरू केले होते. नंतर वीरसेन व्ही. हिवराळे याचे संपादक झाले. सुरवातीला हे छोटेसे वार्तापत्रक चर्च अँन्ड मिशनरी अलायन्सच्या मंडळ्यांतील घडामोडी एकमेकांना कळाव्यात या उद्देशाने काढले होते. पुढे जे. आर. रायबोर्डे हे संपादक झाले व त्यांच्या अमदानीत हे मासिक छापण्यात येऊ लागले. नंतर जयदेव तिमथी सिरवैया हे संपादक व एल. आर. कार्नर हे व्यवस्थापक झाले होते. हे अकोला येथे छापून अंजनगाव (वऱ्हाड) येथे प्रसिद्ध होई. ब्रीदवाक्य म्हणून पहिल्या पृष्ठावर पुढील कविता असे.

भवसागर हा भयानकरूपें खळवळला खाली ।
वरुनि निघाली ख्रिस्त-नाव ही तारक बा झाली ।।
तरुनि जावया हा भवसिंधू ख्रिस्तपदीं झणि रंग ।
प्रेमें विनवी सकळ जनांला ख्रिस्ती रणशिंग ।।

या मासिकात ' इकडे तिकडे चोहीकडे ' या सदरात वरील संस्थेच्या प्रांतातील घडामोडी, बातम्या वगैरे येत. याशिवाय काही धार्मिक लेख, धर्मपर कविता वगैरे मजकूर येत असे. हे मासिक अंदाजे १९५० पर्यंत चालून बंद पडले असे समजते.

हा वेळपावेतो केवळ बायबलचे शिक्षण देण्याच्या हेतूने एकही मासिक निघाले नव्हते. ते सदानंद आप्पाजी पाठक यांनी **दीपक** या नावाने

मुंबईत चालू केले. याचा पहिला अंक १ जून १९४७ रोजी बाहेर पडला. बायबल शिक्षणाबरोबरच प्रार्थना, प्रवचने, गाणी, गोष्टी, शंकानिरसन वगैरे उपयुक्त मजकूर यात येत असे. याची वार्षिक वर्गणी तीन रुपये असून किरकोळ अंक सहा आण्यांस मिळे असे. याचे ब्रीदवाक्य

दीपक दीनदयाळा दिधला जगता पवित्र शास्त्राचा ।
पथ सकलां दावाया, पावित्र्याचा अमूल्य मुक्तीचा ।।
कळो सत्य सकलांते, प्रेम तुझे, थोरवी तुझी राया ।
दीपकप्रभा पडो दे, दिगंतरी यश तुझे प्रभोराया ।।

असे होते. याच्या ध्येयाविषयी लिहिताना पहिल्या अंकात संपादक म्हणतात–

"दीपकाचे कार्य अंधारात उजेड दाखविणे. 'शास्त्ररूप दिवा, देवाने दिधला, वाट दावायाला, पाप्यांलागी ।' त्या शास्त्राची ओळख करून देणे, त्यातल्या वचनांची फोड करून सांगणे व ईश्वराचा संदेश देणे. हे या मासिकाचे प्रमुख कार्य व ध्येय होय." दीपक एस. पी. जी. मिशन प्रेस, अहमदनगर येथे छापून मुंबईत प्रसिद्ध होई. याचे व्यवस्थापक आप्पाजी त्र्यंबक पाठक हे होते. डिसेंबर १९४८ पर्यंत हे मासिक व्यवस्थित चालले होते. शेवटी 'दीपकचे वर्गणीदारांस' या नावाचे चार पानी पत्रक संपादकांनी १ फेब्रुवारी १९४९ रोजी प्रसिद्ध करून पुरेसा लोकाश्रय न मिळाल्यामुळे दीपक बंद केल्याचे जाहीर केले.

यानंतर खास मुलांकरिता आमचा बालमित्र या नावाचे एक मासिक सप्टेंबर १९४७ पासून सुरू झाले. हे स्वतंत्र मासिक आयरीन डोव्हर, लोणंद यांनी स्वखर्चाने काढले होते व काही दिवस त्या या मासिकाच्या संपादिका होत्या. बालबोध मेवा बंद पडल्यापासून मुलांकरिता स्वतंत्र मासिक असावे असे सुमंत धोंडो रामटेके यांना वाटत होते. ते नंतर या मासिकाचे संपादक झाले व एच. जी. हॉवर्ड हे सहसंपादक झाले. तेव्हा हे मासिक कोडोली ( जिल्हा कोल्हापूर ) येथून प्रसिद्ध होऊ लागले. तिसऱ्या वर्षापासून ते नाशिकच्या नागरिक प्रेसमध्ये छापले जाऊ लागले. यात ताईचे पत्र, संपादकीय हितगूज, बोधकथा, कविता वगैरे मजकूर असे. या मासिकाचे ब्रीदवाक्य 'माझ्या कोकरांस चार' असे होते.

याची वार्षिक वर्गणी एक रुपया होती. ती चवथ्या वर्षापासून तीन रुपये करण्यात आली. कित्येकदा पुरेशा लेखांच्या अभावी खुद्द संपादकच निरनिराळ्या टोपण नावांखाली लेख व कविता लिहून अंकाची भरपाई करीत. याच्या चवथ्या वर्षाचा ५ / ६ वा जोड अंक १५ फेब्रुवारी १९५१ रोजी प्रसिद्ध झाला व हाच याचा शेवटला अंक दिसतो. यावेळी आर्थिक अडचणीमुळें रामटेके काही मिशनरी मित्रांची मदत मिळविण्याच्या खटपटीत होते व बालमित्र पुन्हा नियमित चालू होण्याची लक्षणें दिसू लागली होती. परंतु संपादकाच्या अकाली निधनामुळे हे मासिक बंद पडले.

पुढे खिस्ती हितचिंतक हे आणखी एक स्वतंत्र ख्रिस्ती मासिक वऱ्हाडातील मलकापूर येथून प्रसिद्ध होऊ लागले. याचा पहिला अंक डिसेंबर १९४७ त प्रसिद्ध झाला. या मासिकाचे संपादक मधुकर एरन दामले हे होते. मे / जून १९४८ च्या जोड अंकात त्यांनी याचा पूर्वेतिहास दिला आहे. त्यात म्हटल्याप्रमाणे सदरहू मासिक १ मार्च १९४२ रोजी प्रथम हस्तलिखित स्वरूपात निघाले होते व ते १ मे १९४१ पर्यंत त्याच स्वरूपात निघत होते. नंतर ते केडगावच्या मुक्तिमिशन प्रेसमध्ये छापले जाऊ लागले, पण एक वर्षानंतर बंद पडले.

त्यानंतर डिसेंबर १९४७ पासून ते नवीन स्वरूपात निघू लागले. हे तरुणतरुणींचे, सुवार्तिक बंधूंचे, धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक मासिक असल्याचे पहिल्या वर्षाच्या अंकात म्हटले आहे. पुढे याचे ब्रीदवाक्य,

"आपुले हित विस्मरणें, परहित केवळ अपुलें गणणे"

असे देण्यात येऊ लागले. यात धर्मपर लेख, सामाजिक हालचाली, कविता, स्त्रियांकरिता व मुलांकरिता खास लेख असत.

सुरवातीला याची वार्षिक वर्गणी एक रुपया असे. ती नंतर वाढवून तीन रुपये करण्यात आली. हे ऑगस्ट १९४८ पर्यंत चालून बंद पडले. पुढे सप्टेंबर १९५६ पासून ( वर्ष ५, अंक १ ) ते परत सुरू झाले आणि १९६५ च्या सुमारास कायमचेच बंद पडले.

जानेवारी १९४८ पासून आणखी एक स्वतंत्र मासिक प्रगति हे प्रसिद्ध होऊ लागले. याचे संपादक व प्रकाशक सुमंत दयानंद करंदीकर

असून ते मुंबईत प्रसिद्ध होई. याची वार्षिक वर्गणी दोन रुपये असून किरकोळ अंकास तीन आणे पडत. पहिल्या अंकातील संपादकीयात म्हटल्या-प्रमाणे मूळ योजना साप्ताहिक काढण्याची होती पण काही अडचणीमुळे मासिकावरच भागवावे लागले होते. शिवाय 'ख्रिस्ती विचारवंत वाचक ज्या पत्राची इतके दिवस वाट पाहात होते, जी उणीव त्यांना बरेच दिवस भासत होती, ती या मासिकाद्वारे भरून निघणार आहे' असाही निर्वाळा देण्यात आला आहे. तसेच हे ख्रिस्ती समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटणारे, पुरोगामी विचारांचा पुरस्कार करणारे अभिनव मासिक असल्याचे सांगितले आहे. याच्या व्यवस्थापिका सरस्वतीबाई दयानंद करंदीकर या होत्या. दुसऱ्या अंकापासून '**प्रगति**' नाशिकच्या नागरिक छापखान्यात छापली जाऊ लागली. या मासिकाचे ब्रीदवाक्य,

हे भुवन उजळण्या जरी ठाकले सज्ज दिप्तिचे सिंधू ।
ही प्रगति पथावर शिंपील एकच परि तेजाचा बिंदू ।। असे होते.

दुसऱ्या वर्षापासून वर्गणी वाढवून तीन रुपयें करण्यात आली. पुढे जानेवारी १९५० पासून कमलाकर करमरकर हें प्रगतीचे सहसंपादक झाले. यात चालू कादंबरी, बालविभाग, हास्यतुषार, कविता व बातमीपत्रे येत असत. हे मासिक १९५१ पर्यंत सुमारे चार वर्षे चालून नंतर बंद पडले.

त्यानंतर खास साक्षरता प्रसारास वाहिलेले ख्रिस्ती मासिक **खिरस्ती जीवनप्रकाश** हे सप्टेंबर १९४८ पासून ख्रिश्चन अॅन्ड मिशनरी अलायन्स, अकोला या संस्थेतर्फे निघू लागले. याचे संपादक वीरसेन हिवराळे व सहसंपादक एल. आर. कारनर होते. तसेच याचे जनक, शिल्पकार व चालक जेरल्ड एल. कारनर होते. पहिल्या अंकात संपादक म्हणतात,

"आजकाल इकडे तिकड चोहोकडे, शेकडो खेडेगावात खिरस्ती लोक आहेत. ही फार आनंदाची गोष्ट आहे. ख्रिस्ती मंडळी कितीतरी वाढली आहे ... ह्या लोकांना शिक्षण दिले पाहिजे. त्यांची आत्मिक वाढ झाली पाहिजे. त्यांना आत्मिक भूक लागली आहे. पण त्यांना खावयास कसे द्यावे ? ...

त्याचे एक उत्तर म्हणजे खेडेगावातील लोकांसाठी खिरस्ती जीवन-प्रकाश मिळावा आणि त्या प्रकाशात चालून खिरस्ती जीवनात वाढत वाढत जावे, हा या मासिकाचा मुख्य हेतू आहे. नवसाक्षरांकरिता मोठी अक्षरे, बालबोध गोष्टी, आरोग्य, शेती, पाककला वगैरे विषयांवर सोपे लेख, छोटया कथा व कविता हे या मासिकाचे वैशिष्टय.

याचे ब्रीदवाक्य, "येशूने म्हटले, – 'मी जगाचा प्रकाश आहे. जो मला अनुसरतो तो अंधारात चालणार नाही. तर त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील" हे असे

हे काही दिवस अकोला नंतर मुंबई व नाशिक येथे छापले जाई. पुढे १९५९ ते ६३ या काळात ते पुण्यातून निघत होते. नीलकान्त जाधव हे १९६२ त याचे संपादक होते. त्यांनी बरीच मेहनत घेऊन जीवन प्रकाशला नवीन स्वरूप दिले होते. पण हा फरक संबंधितांना मानवला नाही. मग १९६४ पासून ते पुन्हा अकोला येथून निघू लागले. १९६३ ते १९६५ पर्यंत ते खिरश्चन ॲन्ड मिशनरी अलायन्स संस्थेचे व १९६५ च्या नोव्हेंबरपासून जीवनी वचन साहित्यालयाचे झाले व पुणे येथून प्रसिद्ध होऊ लागले.

सप्टेंबर १९७० मध्ये ते फिरून अकोला येथे गेले. डिसेंबर १९७३ पर्यंत वीरसेन हिवराळे याचे संपादक होते. पुढे जानेवारी १९७४ पासून याचे नामांतर व रूपांतर होऊन मुंबईहून दिलीप फणसाळकर, जी. एल. कारनर व हिवराळे यांच्या नेतृत्वाखाली प्रकाशित होत आहे.

यानंतर शांतिदूत या नावाचे एक पाक्षिक वसई येथून प्रसिद्ध होऊ लागले. रमेदी चर्च, वसईचे जे. एस. मिरांडा हे या पाक्षिकाचे संपादक होते. याचा प्रथमांक २५ डिसेंबर १९४८ रोजी प्रसिद्ध झाला. त्यात 'धावता परिचय' या सदरात सदर पाक्षिकाची संवादरूपाने माहिती दिली आहे. त्यात सांगितले आहे, "मुंबई धर्मप्रान्ताचे देशी महागुरू व प्रधान गुरू (बिशप व विगार जराल) ह्यांनी लोकांच्या सर्वांगीण सुधारणेकरिता नवीन मराठी पत्र काढण्याचे ठरविले आहे." हे पाक्षिक दर महिन्याच्या १० व २५ तारखेस प्रसिद्ध होई. वार्षिक वर्गणी साडेतीन रुपये असून

किरकोळ अंकास दोन आणे पडत. मॅनेजर एस. वास हे होते. यात " सामाजिक व धार्मिक नाटके, उत्तम कविता, ख्रिस्त पुराणातले वेचक व रसिक परिच्छेद, संभाषणे, इतिहास, राजकीय बातम्या, साधुसंतांची आयुष्यचरित्रे, महात्माजींची शिकवण व किस्सा, उद्योगधंद्यांची माहिती, कायद्यांची जाणीव, धर्मशास्त्र, राजकारण, समाजसुधारणा, शिक्षण, कला, विनोद वगैरे विविध अभ्यासानंद, तसेच जनन, मरण, लग्न, सण, सभा यांच्या जाहिराती व माहितीजनक फोटो व चित्रे असली तरच लोकांचे मनमुराद हर्ष व ज्ञान वाढेल. " अशीही इच्छा व्यक्त करण्यात आली होती.

पुढे २५ नोव्हेंबर १९४९ च्या अंकात ' दुःखाची गोष्ट ' या शीर्षकाखाली पुढीलप्रमाणे निवेदन करण्यात आले. " शांतिदूत पाक्षिकाचे मालक जे मुंबईचे बिशप ग्रेशियस ह्यांच्या आज्ञानुसार सर्वांना कळविण्यात येत आहे की, येत्या नाताळच्या सणादिवशी निघणारा विशेष अंक हा ह्या वर्षाचा शेवटचा अंक म्हणून निघेल. त्यानंतर काही काळपर्यंत पाक्षिक निघणार नाही. (Suspended) " त्याप्रमाणे २५ डिसेंबर १९४९ चा शेवटला अंक काढल्यावर हे पाक्षिक बंद करण्यात आले.

यापुढले स्वतंत्र मासिक म्हणजे पुण्याहून प्रकाशित होऊ लागलेले सत्यवाणी. याचे संपादक बाबुराव कोरे, खजिनदार जयवंत भगवंत भांबळ आणि प्रकाशक दानिएल एन. डोंगरे होते. पद्मावाई चक्रनारायण या महिला विभागाच्या प्रमुख होत्या. या मासिकाचा पहिला अंक १० जुलै १९४९ रोजी बाहेर पडला. वार्षिक वर्गणी तीन रुपये व किरकोळ अंकास पाच आणे पडत.

' पुरोगामी विचारांचा निर्भीडपणे पुरस्कार करून समाज जागृतीसाठी झटणारे अभिजात वाङमयीन ख्रिस्ती समाजाचे एकमेव मराठी मासिक ' असे वर्णन या बाबत निघालेल्या पत्रिकेत करण्यात आले होते. ' ख्रिस्तविजय सांस्कृतिक कलापथक ' या नव्यानेच निघालेल्या संस्थेच्या साहित्य – विभागाचे हे मासिक होते. परमेश्वराच्या सान्निध्यात, दावीदाच्या गोफणीतील फटकारे, शलमोनाच्या देवडीवरून, नानांची पत्रे वगैरे सदरे व कविता आणि बातम्या यात येत.

१९५० पासून व्ही. ए. कोरे हे संपादक व दानिएल डोंगरे हे सहसंपादक झाले. पुढे याचा आकार व पृष्ठे कमी करून वर्गणी दीड रुपया करण्यात आली.

हे सत्यवाणी झंकार । करतील विश्वाचा उद्धार ॥

हे याचे ब्रीदवाक्य झाले.

'मानवी मूल्यांच्या सर्वांगीण विकासास वाहिलेले ख्रिस्ती जनतेचे आवडते मासिक' असे याचे वर्णन करण्यात येऊ लागले. या मासिकाचे नोव्हेंबर १९५७ पर्यन्तचे अंक उपलब्ध आहेत. पुढे ते बंद पडले.

यानंतर **सूर्यकिरण** या नावाचे पाक्षिक पुण्याहून प्रसिद्ध होऊ लागले. याचे संपादक प्रभाकर नथोजी हे असून वि. दा. गायकवाड हे सहसंपादक होते. याची वार्षिक वर्गणी रु १-४-० होती. हे पाक्षिक 'पुरोगामी विचारांचे आणि ख्रिस्ती समाजाचे सर्वांगीण उन्नतीस वाहिलेले' असे याचे वर्णन १६-११-१९४९ च्या वर्ष १ ले अंक ३ रा या एक पानी पुरवणी अंकावर दिलेले आहे. तसेच 'अत्यंत गरीब खिरस्ती नागरिकास अंक मोफत. नाव व पत्ता कळवा' असे संपादकांनी म्हटले आहे. या उपलब्ध अंकावरून याचा पहिला अंक आक्टोबर १९४९ मध्ये निघाला असावा असे अनुमान करता येते.

यानंतर **विक्रम** या नावाचे आणखी एक साप्ताहिक पुण्यात निघू लागले. याचे संपादक एस. आर. पवार व व्ही. ए. कोरे हे होते.

जें जें आपणासी ठावे । तें ते सकळां शिकवावें ।
शहाणे करूनि सोडावे । सकळ जन ॥

हे याचे ब्रीद. याचा पहिला अंक २०-११-४९ रोजी प्रसिद्ध झाला. दर रविवारी हे साप्ताहिक प्रसिद्ध होई. यात आठवड्याचे संपूर्ण भविष्य, फिल्मी दुनियेतील फेरफटका, कविता, बातम्या वगैरे येत असे. याचे प्रकाशक विक्रमसिंह आप्पाजी कोरे हे होते. वार्षिक वर्गणी पुण्यात दीड रुपया व बाहेरगावी दोन रुपये पाच आणे होती. किरकोळ अंक अर्ध्या आण्यात मिळे. याचे एक दोनच अंक पाहण्यात आले. ते किती दिवस चालले हे नक्की कळू शकले नाही.

# जाता जाता ....

एकोणिसाव्या शतकातल्या आणि विसाव्या शतकातल्या पूर्वार्धातील मराठी ख्रिस्ती नियतकालिकांचा हा त्रोटक इतिहास. या कालावधीत माझ्या माहितीप्रमाणे पाऊणशेहून अधिक कालिके उदयास आली. त्यातली जेमतेम सहासातच कशीबशी तग धरून आहेत. विशेष म्हणजे यांतले एक देखील स्वतंत्र नाही· कुणा ना कुणा मिशनाच्या वा अन्य संस्थेच्या आश्रयाने ती मार्गक्रमण करीत आहेत.

गेल्या शतकात निदान एकतीस तरी नियतकालिके निघाली होती. त्यांतली केवळ दोनच आजतागायत चालू आहेत· ती म्हणजे मिशनसंस्थांच्या सहकार्याने वाटचाल करत आलेला ज्ञानोदय आणि मुक्तिफौजेतर्फे चालू असलेला सिंहनाद. आमचे पहिले कालिक ज्ञानोदय याच्या जन्मापासून म्हणजे १८४२ पासून तो १९०० पर्यंतच्या अठ्ठावन्न वर्षाच्या काळात आमच्या इवल्याश्या समाजाने एकतीस नियतकालिके काढावीत ही निःसंशय अभिमानास्पद गोष्ट वाटावी. परंतु यांचा इतिहास वरवर चाळला तरी निराशाच पदरी येते, कारण यांतली बहुतेक नियतकालिके मोजक्या वर्षांतच (कित्येक तर काही महिन्यांतच) अस्तास गेली. काही मिशनांनी चालविली. काही स्वतंत्र वा वैयक्तिक जबाबदारीवर चालविण्यात आली, पण बव्हंशी लोकाश्रयाच्या अभावीच बंद पडली, असे दिसून येते. चालू शतकाच्या पूर्वार्धातही सुमारे पंचेचाळीस कालिके उदयास आली आणि आजवर हिशेब केला तर हा आकडा पाउणशेहून अधिक होतो.

यांचाही इतिहास मोठा उत्तेजक आहे असे नाही. केवळ वीसबावीस कशीबशी जगत आहेत.

हे असे का व्हावे ? ही सर्वच कालिके इतक्या निकृष्ट दर्जाची होती काय ? एकही कालिक आमच्या वाचकांच्या मनाची पकड घेऊ शकले

नाहीं का ? वाङ्मयमहर्षी बाबा पदमनजी सारख्यांनी सहा मासिके चालविली, पण ती सगळी बंद पडली. कविवर्य नारायण वामन टिळकांनी काढलेली व चालविलेली तीनचार मासिकेदेखील पटापटा बंद पडली. या निराशाजनक इतिहासाला वा परिस्थितीला जबाबदार कोण ? 'आम्ही गरीब आहोत.' हे पालुपद आळवून आळवून गाणाऱ्या आपल्या समाजात आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळें वार्षिक वर्गणी अगर फुटकळ अंकाची किंमत भरू न शकणारे लोक मूठभर निघतील. तेव्हा आपल्या नियतकालिकांना तग धरून राहण्यास पुरेसा लोकाश्रय मिळणें महाकठीण नाही असा अंदाज बांधता येतो.

व्यवसाय किंवा निर्वाहाचे साधन अशी व्यापारी वृत्ती ठेवून कुणी एखादे मासिक काढले आहे किंवा होते असे माझ्यातरी ऐकिवात नाही. म्हणूनच आपल्या मासिकांची वा नियतकालिकांची वर्गणी भरमसाट नव्हे पण केवळ जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याइतपतच ठेवलेली असते व सर्वसाधारण व्यक्तीच्या खिशाला परवडणारी असते.

असे असूनही सामाजिक, राजकीय, धार्मिक वगैरे अनेक विषयांस वाहिलेले एखादे कालिक ( कुणाही मिशनाच्या वा मिशनरीच्या मदती शिवाय ) काढून स्वतंत्ररीत्या चालविणे म्हणजे एक दिव्य होऊन बसलें आहे गेल्या पाचपंचवीस वर्षात तर अनेक नवोदित संपादकांनी मोठ्या उत्साहाने मासिके काढली, शेंपन्नास वर्गणीदार मिळविले, तेवढ्या द्रव्यबळावर दोन तीन अंकांची बिले भरली आणि --- आणि काय ? वर्षाची वर्गणी भरणारे वाचक पुढल्या अंकाची वाट पाहून शिणलें.

आता फुटकळ अंक घेणारे फार तर भेटतील, पण वार्षिक वर्गणी भरणारे मिळणे महामुष्किल झाले आहे. पंधरावीस हजारावर पाणी सोडायची तयारी असणारानेच स्वतंत्र मासिक काढायच्या फंदात पडावे. फुकटच्या वाचकांना अर्थात कशाचा खेद ना खंत !

आज वर्गणीदारांचा किमानपक्षी एक हजाराचा उच्चांक गाठणारी किती चालू नियतकालिके आहेत ? उभ्या महाराष्ट्रात त्यांना निदान एक

हजार वर्गणीदार का मिळू नयेत ? मराठी खिस्ती वाचकांची संख्या खरेच का इतकी रोडावली आहे ?

आपले वाचक – लेखक – संपादक या त्रयीच्या भूमिका पाहिल्या तर जणू एखादे घातचक्र फिरते आहे असे वाटावे. वाचकांचे म्हणणे असे की या आमच्या मासिकांत काहीच अर्थ नाही. हॉटेलातील राईस प्लेट मधल्या ठराविक पदार्थाप्रमाणेच ठराविक ठशाचे लिखाण, तेचतेच लेखक, तीचतीच साचेबंद प्रवचने हाच आमच्या मासिकांचा सारा संसार ! विषय तोच, भाषाशैली तीच आणि रडगाणेही तेच ! मग कशाला उधळा पैसे यांच्यावर ? आमच्या अपेक्षा ही मासिके पुरी करू शकत नाहीत.

लेखकांकडे नजर टाकावी तो त्यांचेही तसेच निराशेचे उद्गार ! ‘आमचे लेख कुणी छापतच नाहीत ! एक तर साभार परत येतात, नाही तर संपादकीय भट्टीत तावूनसुलाखून निघून नव्याच रुपाने प्रकाशित होतात. मग हा आपलाच का लेख ? अशी आम्हांला शंका येते ! नवोदित लेखक कवींना कुणी उत्तेजन देत नाही. काही लिहायला कुणाचे प्रोत्साहन मिळत नाही ! ’ इत्यादी.

राहता राहिले संपादक ! त्याची तर सदाचीच ओरड असते की कुणी काही ( छापण्याजोगे ) लिहीतच नाही. बरे, लिहितात तेही धड नाही. भाषा पहावी तर बोजड व अशुद्ध ! लेख पहावा तर तोही भाषांतरित वा अनुवादित किंवा चोरलेल्या कल्पनेवर आधारलेला ! कविता पहावी तर तिला कविता का म्हणावे हाच प्रश्न !

अशा परिस्थितीत आमच्या नियतकालिकांचा संसार कसा काय टिकायचा ? एकमेकांकडे बोट दाखविणाऱ्या या त्रयीचे घातचक्र कोण मोडून काढणार ? या अशा परिस्थितीला जबाबदार कोण समजायचे ?

आणखी एक महत्त्वाचा प्रश्न. आमच्या या छोट्याशा समाजाला एवढ्या भाराभर नियतकालिकांची खरेच आवश्यकता आहे काय ? यांतली काही बंद करून वा करवून मोजकीच पण दर्जेदार आणि भारदस्त नियतकालिके आम्हांला टिकवून ठेवता येणार नाहीत का ?

जाता जाता एकदोन सूचना कराव्याशा वाटतात; त्या अनाठायी वाटणार नाहीत एकतर प्रत्येक संपादकाने आपापल्या मासिकाचे दप्तर ठेवायला हवे. असा प्रयत्न केल्याचे क्वचितच नजरेस येते. प्रत्येक वर्षाचे अंक बांधून कुठे तरी उपलब्ध होतील अशा रीतीने अगर एक दोन ग्रंथालयांत ठेवले तर उपयुक्त ठरेल. आजचे अंक वाचून झाल्यावर त्यांना मोल राहात नाही. फार झाले तर रद्दीचा भाव. पण हेच अंक कालांतराने आपल्या समाजाचा बोलका इतिहास ठरणार आहेत. ही सूचना करण्याचे कारण केवळ वीस पंचवीस वर्षांपूर्वी निघालेल्या नियतकालिकांचे अंक आज उपलब्ध नाहीत. पत्रद्वारे व संपादकांना प्रत्यक्ष भेटूनही मला अनेक कालिकांची माहिती मिळू शकली नाही. माहीत नाही किंवा आठवत नाही अशीच संपादकांकडून उत्तरे मिळाली. एखादे कालिक काढण्याचा आपण उपद्व्याप केला होता याची या महाशयांना पुढे आठवणदेखील राहणार नाही. खासगीरीत्या जतन केलेले अंक दाखवायलाही कुणी काकू करतात असे मला आढळले. तेव्हा संपादकांनी किंवा संबंधित संस्थांनी वा आपल्या ग्रंथालयांनी आपल्या नियतकालिकांचे जतन करणे अत्यावश्यक आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्येक अंकावर योग्य वर्ष व क्रमांक हवा. कित्येकदा वर्षानुवर्षं तेच ‘ वर्ष ’ दिलेले असते, तर कधी काहीच दिलेले नसते. या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यामुळे कित्येक कालिकांचे मूळ शोधणे दुरापास्त झाले आहे.

आजचे संपादक व होऊ घातलेले उद्याचे संपादक या माझ्या सूचना अवश्य विचारात घेतील अशी मला उमेद आहे.

REFBK-0023281

२८८३
२३२६९
निबंध
६१४६

## महाराष्ट्र ख्रिस्तीसाहित्य परिषदेची प्रकाशने :

ख्रिस्ती साहित्य संमेलन १९७३
ख्रिस्ती साहित्य : काही पैलू १९७५
संवाद : वासंतिक प्रकाशन १९७९

---

किंमत तीन रुपये